भारतीय संगीताचा इतिहास व विकास

इयत्ता बारावी



भारताचे संविधान

भाग ४ क

नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

अनुच्छेद ५१ क

मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. ३१.०१.२०२० रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

भारतीय संगीताचा इतिहास व विकास

इयत्ता बारावी



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,पुणे

G5X7R8

आपल्या स्मार्टफोनवर DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q.R.Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०२०
पुनर्मुद्रण : २०२२

भारतीय संगीताचा इतिहास व विकास अभ्यासगट

डॉ. संदीपान जगदाळे
डॉ. हरीभाऊ खंडारे
प्रा. हरीसर्वोत्तम जोशी
श्री. जयराज कलसी
श्री. ज्ञानेश्वर गाडगे
श्रीमती आनंदी देशमुख
डॉ. स्नेहल शेंबेकर
डॉ. अर्चना अंभोरे
प्रा. ऋषिकांत मेसेकर
डॉ. अजयकुमार लोळगे (सदस्य- सचिव)

अक्षरजुळवणी
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

मुखपृष्ठ व सजावट
श्रीमती प्रज्ञा काळे

अंतर्गत चित्राकृती
श्री. अभिजीत धोत्रे

निर्मिती
श्री. सच्चिदानंद आफळे,
मुख्य निर्मिती अधिकारी
श्री. संदीप आजगावकर,
निर्मिती अधिकारी

कागद
७० जी.एस.एम. क्रीमवोव्ह

मुद्रणादेश
N/PB/2022-23/Qty.0000

मुद्रक
M/s

प्रमुख संयोजक
डॉ. अजयकुमार लोळगे
विशेषाधिकारी कार्यानुभव व
प्र. विशेषाधिकारी, कला शिक्षण,
प्र. विशेषाधिकारी, आरोग्य व शारीरिक शिक्षण,
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

प्रकाशक
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक,
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई - २५

भारताचे संविधान

उद्‌देशिका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्‌धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

आमच्या संविधानसभेत
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्‌वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.

राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

प्रस्तावना

इयत्ता बारावीचे 'भारतीय संगीताचा इतिहास व विकास' हे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना आनंद होत आहे. आजच्या धावपळीच्या व स्पर्धेच्या युगात तणावमुक्त व आनंदी जीवन जगता यावे, भारतीय संगीतातील गायन, वादन, नृत्य व नाट्य यांची ओळख व्हावी हे विचारात घेऊन या पाठ्यपुस्तकातील पाठ व स्वाध्याय यांची योजना केलेली आहे. पाठ्यपुस्तकाच्या सुरुवातीलाच क्षमता विधाने दिली आहेत. त्यावरून कोणती सांगीतिक कौशल्ये तुम्हांला आत्मसात करावयाची आहेत याची कल्पना येऊ शकेल.

दैनंदिन जीवनात संगीताला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे मनोरंजन, तणावमुक्ती व आनंद प्राप्ती करून घेण्यासाठी हे पाठ्यपुस्तक निश्चितच उपयुक्त ठरेल. अध्ययन प्रक्रिया सुलभ होण्यासाठी बंदिशी स्वरलेखनासह दिलेल्या आहेत.

पाठ्यपुस्तकाच्या अंतरंगात डोकावल्यावर लक्षात येईल की त्यामध्ये विविध सांगीतिक संकल्पना, गायन, वादन व नृत्य प्रकारांचा समावेश केला आहे. भारतीय संगीताचा देदीप्यमान वारसा सांगणारा इतिहास समाविष्ट केला आहे. काही कलावंतांचा आपणास परिचय होणार आहे. सर्व पाठांतील आशय व सांगीतिक वैविध्य तुम्हांला कलावंत होण्यास नक्कीच खुणावेल. त्याहीपेक्षा कठोर परिश्रमाची तयारी, शालीनता, विनयशीलता व नम्रपणा असे गुण विकसित होण्यासाठी मदत करेल.

गुरुकुल पद्धती आणि आधुनिक संगीत शिक्षण पद्धती तसेच संगीत विकासात विज्ञानाचे महत्त्व याविषयी विस्तृत माहिती पाठांद्वारे देण्यात आली आहे. पाठाखालील स्वाध्यायाचे स्वरूप आणि वैविध्यपूर्ण रचना हे या पाठ्यपुस्तकाचे वैशिष्ट्य आहे. स्वाध्याय तुम्हांला पाठाचे अंतरंग समजून घेण्यास मदत करतील. तुमच्यातील कल्पकता, सर्जनशीलता, विचारशक्ती आणि आकलनशक्ती विकसित करण्यासाठी हे स्वाध्याय निश्चितच उपयुक्त ठरतील. गुरूंचे मार्गदर्शन आणि तुमचा सातत्यपूर्ण रियाज यातून तुम्हांला ईप्सित साध्य करता येईल.

अध्ययन प्रक्रिया आनंददायी होण्यासाठी क्यू. आर. कोडद्वारे दृकश्राव्य माहिती आपणास उपलब्ध होईल. अध्ययन-अध्यापन प्रभावीपणे, सहजतेने व आनंदाने होण्याचा हेतू यातून साधला जाईल. पाठ्यपुस्तक वापरताना काही शंका वा अडचणी आल्यास मंडळाला जरूर कळवाव्यात.

(विवेक उत्तम गोसावी)
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.४

पुणे
दिनांक : २१ फेब्रुवारी २०२०
भारतीय सौर : २ फाल्गुन १९४१

शिक्षकांसाठी

मित्रहो,

संगीत हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. स्वानंद, मनोरंजन, श्रमपरिहार, व्यक्तिमत्त्व विकास किंबहुना चरितार्थासाठीही संगीत उपयुक्त ठरते. असा आनंददायी, महत्त्वपूर्ण आणि तितकाच आव्हानात्मक असलेला 'भारतीय संगीताचा इतिहास व विकास' हा विषय शिकवण्याची जबाबदारी आपण पार पाडणार आहात त्याबद्दल आपले प्रथमत: मन:पूर्वक अभिनंदन!

अध्ययन–अध्यापन प्रक्रिया

(१) या अभ्यासक्रमात गायन, वादन, नृत्य व नाट्य या विषयांची ओळख करून देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांतील सुप्त कलागुण ओळखून त्यांना प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे.

(२) पुस्तकातील सर्व घटक ज्ञानरचनावादी पद्धतीने शिकवणे अपेक्षित आहे. त्यासाठी प्रत्येक घटकानंतर काही स्वाध्याय, स्वमत, स्वनिर्मिती, आकृतिबंध पूर्ण करणे व इतर उपक्रम देण्यात आले आहेत. कोणतेही प्रकरण शिकवण्याआधी त्याचा अभ्यास करून त्यातील उपक्रमांचे नियोजन तुम्हांला करावयाचे आहे.

(३) विद्यार्थ्यांना अधिकाधिक ज्ञान मिळावे, तसेच अध्ययन प्रक्रिया आनंददायी व्हावी यासाठी दिलेला क्यू. आर. कोड हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे.

(४) सौंदर्यदृष्टी, वैयक्तिक जाणीव, स्वविकास हे कलाशिक्षणाचे मूळ ध्येय असल्यामुळे केवळ निर्देशवजा अध्यापन नव्हे तर आंतरक्रियात्मक पद्धतीने अध्यापन करणे अपेक्षित आहे.

(५) विद्यार्थ्यांमध्ये उत्तम कलाकार किंवा व्यावसायिक कलाकार म्हणून आवश्यक कौशल्ये विकसित होतील या दृष्टीने प्रयत्न करणे अपेक्षित आहे. यासाठी विविध कलाकारांच्या मुलाखती, भेटी आयोजित कराव्यात. विविध संकेतस्थळांवरून अधिक माहिती मिळवावी.

(६) भारतीय संगीत या विषयात खालीलप्रमाणे चार प्रात्यक्षिक विषयांचा समावेश केला आहे. या प्रात्यक्षिक विषयांपैकी **कोणताही एक प्रात्यक्षिक विषय** विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार घेता येईल.

(अ) कंठ शास्त्रीय संगीत
(क) वाद्य संगीत
(ब) कंठ सुगम संगीत
(ड) तालवाद्य

(७) विषयाची महती, उपयोगिता व सार्थकता सिद्ध करण्याचे आव्हान आपणा सर्वांपुढे आहे. हे सर्व पेलण्यासाठी व इच्छित ध्येय साध्य करण्यासाठी हे पुस्तक निश्चितच उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो. कंठ शास्त्रीय संगीत, कंठ सुगम संगीत आणि वाद्य संगीत या विषयांतील सादरीकरण हा भाग परीक्षेत विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाचे सादरीकरण असा असेल. या सादरीकरणाची तयारी परीक्षेच्या दृष्टीकोनातून करून घेणे अपेक्षित आहे. **या पुस्तकात काही नमुनादाखल उदाहरणे, गीते, बंदिशी इत्यादी दिली आहेत. शिक्षकांनी त्यामध्ये प्रात्यक्षिक विषयानुरूप बदल करण्यास हरकत नाही.** सतार वाद्य शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना वाद्य संगीत पाठ्यक्रमात दिलेल्या गती शिकवणे अपेक्षित आहे तर इतर वाद्य शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना वाद्यसंगीतातील गती शिवाय कंठ शास्त्रीय संगीत अंतर्गत दिलेले छोटे ख्याल व बडे ख्याल वाजवण्यास हरकत नाही.

यापूर्वी भारतीय संगीताचा इतिहास व विकास या विषयाची शिक्षक हस्तपुस्तिका तयार करण्यात येत असे. परंतु यावर्षी प्रथमच 'भारतीय संगीत' विषयाचे पाठ्यपुस्तक तयार केले आहे. याचा उपयोग विद्यार्थी, शिक्षक तसेच पालक व जिज्ञासू वाचकांना निश्चित होईल, असे अभ्यास गटास वाटते.

या पुस्तिकेच्या गुणवत्ता परीक्षणाचे काम **श्रीमती सुषमा पाठक आणि श्री. रवींद्र क्षीरसागर** यांनी केले. अभ्यासगट त्यांचे आभारी आहे.

अभ्यास गट
भारतीय संगीताचा इतिहास व विकास
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

विद्यार्थ्यांसाठी

विद्यार्थी मित्रांनो,

इयत्ता बारावीमध्ये आपले स्वागत. 'भारतीय संगीताचा इतिहास व विकास' हे पुस्तक आपल्या हाती देताना विशेष आनंद होत आहे. भारतीय संगीताने कलेच्या अभ्यासक्रमाने सुरुवातीपासूनच आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. सदर पुस्तकाच्या माध्यमातून केवळ भारतीय संगीताचा इतिहास व विकास ज्ञात होणे एवढ्यावरच मर्यादित न राहता स्वत:ला देखील सांगीतिक विकास व नवनिर्मितीचा आनंद घेता येणार आहे. त्या दृष्टीने या विषयामध्ये सैद्धांतिक व प्रात्यक्षिक असे दोन भाग आहेत. सैद्धांतिक हा भाग अनिवार्य आहे तर प्रात्यक्षिकांमधून तुमच्या आवडीनुसार कोणत्याही एका प्रात्यक्षिकाची निवड तुम्हांला करता येईल.

संगीत हा आपल्या जीवनातील एक अविभाज्य घटक असल्याने संगीताच्या साहाय्याने आपले जीवन, जीवनातील प्रत्येक क्षण प्रफुल्लित होण्यास मदत होते. संगीत हे माणसाला मानसिक स्वास्थ्य प्रदान करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत असते.

या पुस्तकाचा विचार करताना दैनंदिन जीवन व संगीत त्याचबरोबर भारतीय संगीताचा प्राचीन काळापासून ते आजपर्यंतच्या काळापर्यंतचा कालपरत्वे बदललेला इतिहास संक्षिप्त स्वरूपात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. गायन, वादन व नृत्य-नाट्य या संकल्पना स्पष्ट करत असताना त्यामध्ये येणाऱ्या महत्त्वाच्या परिभाषा, रागांची, गीतांची, तालांची तसेच नृत्यसंकल्पनांची संक्षिप्त माहिती दिली आहे. आपले संपूर्ण जीवन कलेला वाहिले आहे, कलेची अखंड सेवा केली आहे, अशा काही कलाकारांच्या जीवनाचे थोडक्यात चित्रण मांडण्याचा प्रयत्नदेखील या पुस्तकाच्या माध्यमातून केला आहे. त्यांची अधिक माहिती आपण इंटरनेट, मासिके, संदर्भ पुस्तकांमधून मिळवणे अपेक्षित आहे.

कला ही शास्त्र व क्रियात्मक स्वरूपात विभागलेली असते. शास्त्राबरोबरच क्रियात्मक म्हणजेच प्रात्यक्षिक कार्यावरही भर देत असताना कंठ शास्त्रीय संगीत, कंठ सुगम संगीत, वाद्य संगीत व तालवाद्य संगीत या विषयांचा समावेश प्रात्यक्षिकांमध्ये केलेला आहे. प्रात्यक्षिकांचा सरावही (रियाज) तितकाच महत्त्वाचा घटक आहे. त्या दृष्टीने शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सराव करावा.

या पुस्तकातील प्रत्येक पाठाच्या शेवटी स्वाध्याय दिलेला आहे. स्वाध्याय कृतिपत्रिकेवर आधारित तयार केला आहे. स्वमत, स्वत:च्या संकल्पना, संदर्भ ग्रंथ विचारात घेऊन स्वाध्याय सोडवणे आवश्यक आहे.

भारतीय संगीताचा इतिहास व विकास या पुस्तकाच्या माध्यमातून संगीत विषयाचा अभ्यास करण्यासाठी आपणांस शुभेच्छा!

अभ्यास गट
भारतीय संगीताचा इतिहास व विकास
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

भारतीय संगीताचा इतिहास व विकास

क्षमता विधाने

(१) स्वातंत्र्यपूर्व काळापासून स्वातंत्र्योत्तर काळापर्यंत संगीताच्या विविध कालखंडांचे विश्लेषण करून संगीताच्या बदलत्या स्वरूपाची चिकित्सा करण्याची क्षमता विकसित होणे.
(२) सामवेदामध्ये ईश्वर भक्तीपुरते मर्यादित असलेले संगीत कालांतराने कसे बदलत गेले, नवनवीन सांगीतिक ग्रंथ व गीतप्रकारांचा कसा विकास झाला याबद्दलची जाणीव निर्माण होणे.
(३) निसर्गातील संगीताचे व मानवनिर्मित संगीताचे श्रवण करून दोन्ही प्रकारच्या संगीताची स्वानुभूती घेण्याची क्षमता विकसित होणे.
(४) विविध संगीत प्रकार ऐकून नवीन रचना निर्माण करण्याची क्षमता विकसित होणे.
(५) संगीताच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लागणे.
(६) विविध सांगीतिक परिभाषांचा अभ्यास करताना चिकित्सक वृत्ती वृद्धिंगत करणे.
(७) अभिजात संगीत कलेच्या सादरीकरणासाठी मूळ परिभाषा समजून घेणे.
(८) संगीताच्या विविध व्याख्या अभ्यासून संगीतातील विविध प्रकारांचे सादरीकरण करण्याची क्षमता विकसित होणे.
(९) भारतीय संगीतातील विविध तालांची ओळख होणे.
(१०) विविध तालांचा परिचय होऊन ते अभिव्यक्त करण्याची क्षमता निर्माण होणे.
(११) विविध तालांचा अभ्यास करून तालांचे सादरीकरण करण्याची क्षमता / कौशल्य निर्माण होणे.
(१२) गायन-वादनाचे सादरीकरण करताना तालांचे योग्य उपयोजन करण्याची क्षमता विकसित होणे.
(१३) विविध गीत प्रकार व नृत्य प्रकारांची माहिती होणे.
(१४) विविध गीतप्रकार व सादरीकरण करण्याची क्षमता विकसित होणे.
(१५) एखाद्या नृत्य अथवा संगीत प्रकारांच्या कलाविष्काराचे निरीक्षण करून त्यातील स्वत:ला भावणाऱ्या जागांना दाद देण्याची क्षमता वाढीस लागणे.
(१६) विविध संगीत प्रकारांचा स्वीकार करण्याची क्षमता वाढणे.
(१७) संगीताचा देदीप्यमान वारसा जोपासण्याची क्षमता वाढीस लागणे.
(१८) घन, अवनद्ध, सुषिर व तत् वाद्यांची रचना, वादनशैली यांबाबत विद्यार्थ्यांमध्ये अभ्यास करण्याचा दृष्टिकोन विकसित होणे.
(१९) भारतीय संगीतातील विविध वाद्यांचा परिचय होणे.
(२०) संगीत प्रकाराच्या आवश्यकतेनुसार योग्य वाद्यांचा उपयोग करण्याचे ज्ञान होणे.
(२१) एखाद्या नवीन वाद्याची निर्मिती करण्याचे कौशल्य विकसित होणे.
(२२) पं. पलुस्कर, पं. भीमसेन जोशी व पं. रविशंकर यांसारख्या महान कलाकारांच्या जीवन चरित्रांच्या अभ्यासातून त्यांच्यासारखे यशस्वी कलाकार घडण्यासाठी प्रेरणा मिळणे.
(२३) थोर कलावंतांचे कार्य अभ्यासून विद्यार्थ्यांनी कलावंतासारखे ध्येय निश्चित करणे.
(२४) कलावंतांनी निर्माण केलेल्या राग, रचना इत्यादींचा अभ्यास करून विद्यार्थ्यांमध्ये त्यांच्या प्रतिभेनुसार नवनिर्मिती करण्याची क्षमता निर्माण होणे.
(२५) भारतीय संगीत कलेबद्दलची जाणीव व कलेचे महत्त्व समजून घेणे.
(२६) संगीताच्या माध्यमातून स्वत:च्या भावना, विचार व अनुभव व्यक्त करता येण्याची क्षमता विकसित होणे.

प्रात्यक्षिक विषय (कोणताही एक विषय)

(१) कंठ शास्त्रीय संगीत (२) कंठ सुगम संगीत
(३) वाद्यसंगीत (४) तालवाद्य

अनुक्रमणिका

भारतीय संगीताचा इतिहास व विकास (तात्त्विक)

प्रात्यक्षिक विषय

१. कंठ शास्त्रीय संगीत

अ.क्र.	घटक	उपघटक		
१	**स्वर परिचय**	१.१ शुद्ध स्वर	१.२ विकृत स्वर	१.३ स्वर अलंकार
२	**रागांची शास्त्रीय माहिती (ओळख)**	२.१ राग – बिहाग २.२ राग – भैरवी २.३ राग – केदार	२.४ राग – बागेश्री २.५ राग भैरवी २.६ राग – मालकंस	२.७ राग – खमाज **(वाद्यसंगीत घटक क्र. २ मध्ये पहावा.)**
३	**रागांचा स्वरविस्तार**	३.१ राग – भूपाली ३.२ राग – यमन	३.३ राग – बागेश्री ३.४ राग – बिहाग	३.५ राग – केदार
४	**सादरीकरण(छोटा ख्याल) (२ अपेक्षित)**	४.१ राग – खमाज ४.२ राग – मालकंस ४.३ राग –बागेश्री	४.४ राग – बिहाग ४.५ राग – केदार ४.६ राग – भैरव	स्थायी – अंतरा दोन दोन आलाप – ताना अपेक्षित
५	**सादरीकरण (बडा ख्याल) (१ अपेक्षित)**	५.१ राग – भूपाली	५.२ राग – यमन	एक बडा ख्याल अपेक्षित
६	**सादरीकरण**	६.१ तराणा ६.२ धृपद	**(अभ्यासक्रमातील कोणत्याही किमान एका रागामध्ये)**	
७	**सादरीकरण**	७.१ लक्षणगीत ७.२ सरगमगीत	**(अभ्यासक्रमातील कोणत्याही किमान एका रागामध्ये घटक क्र. ४ मधील राग)**	
८	**तालपरिचय (प्रात्यक्षिकासह)**	८.१ इयत्ता ११ वीचे सर्व ताल ८.२ दिपचंदी	८.३ चौताल ८.४ धमार ८.५ एकताल	**(तात्त्विकमधील घटक क्र. ६ मध्ये पहावा.)**
९	**पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या(प्रात्यक्षिकासह)**	९.१ आलाप ९.२ तान	९.३ मींड ९.४ कणस्वर ९.५ मुर्की	**(तात्त्विकमधील घटक क्र. ३ मध्ये पहावा.)**
१०	**स्वरलेखन**	घटक क्र. ३ व घटक क्र. ४ मधील रागांपैकी कोणत्याही रागात दोन छोटा ख्यालाच्या बंदिशीचे स्वरलेखन करणे.		
११	**सादरीकरण**	११.१ जन – गण – मन	११.२ वंदे मातरम् **(इयत्ता ११ वी च्या पुस्तकात पहावे)**	
१२	**प्रात्यक्षिक नोंदवही**	प्रात्यक्षिकांची नोंद करणे. **(या घटकासाठी स्वतंत्र वही तयार करून त्यामध्ये स्वरलेखन व इतर माहितीची नोंद करणे अपेक्षित आहे.)**		

२. कंठ सुगम संगीत

अ.क्र.	घटक	उपघटक		
१	**स्वर परिचय**	१.१ शुद्ध स्वर	१.२ विकृत स्वर	१.३ स्वरालंकार
२	**रागांची शास्त्रीय माहिती (ओळख)**	२.१ राग – दुर्गा २.२ राग – केदार २.३ राग – देस	२.४ राग – भीमपलास २.५ राग– खमाज २.६ राग – बागेश्री	२.७ राग – तिलककामोद २.८ राग – पहाडी
३	**सादरीकरण**	३.१ भजन ३.२ भावगीत ३.३ चित्रपटगीत	३.४ गझल ३.५ लोकगीत ३.६ नाट्यगीत	(भजन व नाट्यगीत अभ्यासक्रमातील रागांवर घटक क्र. २ वर आधारीत)

४	**रागस्वरूप सादरीकरण**	४.१ आरोह-अवरोह व मुख्यअंग (घटक क्र. २ मधील राग)	४.२ सरगम गीत (घटक क्र. २ मधील राग)	
५	**समूहगीत सादरीकरण**	५.१ देशभक्तीपर गीत ५.२ प्रार्थना	५.३ स्वागतगीत ५.४ गोंधळ	५.५ पोवाडा
६	**तालपरिचय (प्रात्यक्षिकासह)**	६.१ इयत्ता ११ वीचे सर्व ताल ६.२ ताल - खेमटा	६.३ ताल - धुमाळी ६.४ ताल - भजनी	**(तात्त्विकमधील घटक क्र. ६ मध्ये पहावा.)**
७	**पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या**	७.१ पकड ७.२ आलाप	७.३ तान	**(तात्त्विकमधील घटक क्र. ३ मध्ये पहावा.)**
८	**स्वरलेखन**	८.१ सरगम गीत	८.२ नाट्यगीत	**(स्वरलेखन अपेक्षित)**
९	**सादरीकरण**	९.१ जन - गण - मन	९.२ वंदे मातरम् **(इयत्ता ११ वी च्या पुस्तकात पहावे)**	
१०	**प्रात्यक्षिक नोंदवही**	प्रात्यक्षिकांची नोंद करणे. **(या घटकासाठी स्वतंत्र वही तयार करून त्यामध्ये स्वरलेखन व इतर माहितीची नोंद करणे अपेक्षित आहे.)**		

३. वाद्य संगीत (हार्मोनियम / बासरी / व्हायोलिन / सतार)

अ.क्र.	घटक	उप घटक		
१	**स्वर परिचय**	१.१ शुद्ध स्वर	१.२ विकृत स्वर	१.३ स्वरालंकार
२	**रागांची शास्त्रीय माहिती (ओळख)**	२.१ राग - बिहाग २.२ राग - भैरव २.३ राग - केदार	२.४ राग - बागेश्री २.५ राग - भैरवी २.६ राग - मालकंस	२.७ राग - खमाज २.८ राग - पटदीप
३	**राग विस्तार**	३.१ राग - भूपाली ३.२ राग - यमन ३.३ राग - बागेश्री	३.४ राग - बिहाग ३.५ राग - केदार	**(कंठशास्त्रीय संगीत घटक क्र. ३ मध्ये पहावा.)**
४	**सादरीकरण (रजाखानी गत)**	४.१ राग - मालकंस ४.२ राग - खमाज	स्थायी - अंतरा दोन दोन आलाप - ताना अपेक्षित	**(किमान एक राग अपेक्षित)**
५	**सादरीकरण (मसीतखानी गत)**	५.१ राग - भूपाली	५.२ राग - यमन	**(किमान एक राग अपेक्षित)**
टीप : अन्य वाद्यसंगीतासाठी कंठशास्त्रीय संगीतामध्ये दिलेल्या ख्यालानुसार अभ्यास करता येईल.				
६	**सादरीकरण धून**	६.१ खमाज	६.२ काफी	६.३ भैरवी
७	**तालपरिचय (प्रात्यक्षिकासह)**	७.१ इयत्ता ११ वीचे सर्व ताल ७.२ दिपचंदी	७.३ चौताल ७.४ धमार ७.५ एकताल	**(तात्त्विकमधील घटक क्र. ६ मध्ये पहावा.)**
८	**पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या**	८.१ आलाप ८.२ मींड	८.३ सूत ८.४ जमजमा ८.५ घसीट	**(तात्त्विकमधील घटक क्र. ३ मध्ये पहावा.)**

९	**स्वरलेखन**	घटक क्र. ३ व घटक क्र. ४ मधील रागांपैकी दोन रजाखानी गतीचे स्वरलेखन करणे.	
१०	**सादरीकरण**	१०.१ जन - गण - मन	१०.२ वंदे मातरम् **(इयत्ता ११ वी च्या पुस्तकात पहावे)**
११	**प्रात्यक्षिक नोंदवही**	प्रात्यक्षिकांची नोंद करणे. **(या घटकासाठी स्वतंत्र वही तयार करून त्यामध्ये स्वरलेखन व इतर माहितीची नोंद करणे अपेक्षित आहे.)**	

४. तालवाद्य

अ.क्र.	घटक	उपघटक (तात्त्विक)		
१	**संगीतात तालाचे महत्त्व**			
२	**पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या व स्पष्टीकरण**	२.१ कायदा २.२ रेला २.३ तिहाई २.३.१ दमदार तिहाई	२.३.२ बेदम तिहाई २.४ मुखडा २.५ मोहरा	२.६ टुकडा २.७ परन २.८ लग्गी
३	**तालवाद्यांचे विस्तृत अध्ययन (भारतीय व पाश्चात्य)**	३.१ पखवाज	३.२ ढोलक	३.३ ढोलकी
		३.४ ड्रमसेट	३.५ रिदम मशीन	
४	**स्वतंत्र वादन**			
५	**लय आणि लयीचे प्रकार**	५.१ विलंबित लय ५.२ मध्य लय	५.३ द्रुत लय	
६	**तालपरिचय वताललिपीबद्ध**	६.१ ताल परिचय	६.२ ताल लिपीबद्ध करणे	
७	**तालवादकांची जीवनचरित्रे**	७.१ उ. झाकीर हुसेन	७.२ पं. भवानी शंकर	७.३ पं. स्वपन चौधरी

अ.क्र.	घटक	उपघटक (प्रात्यक्षिक)		
१	**खालील तालात लिपीबद्ध करणे. (कायदा आणि टुकडा)**	१.१ त्रिताल	१.२ झपताल	
२	**सादरीकरण**	२.१ कायदा, मोहरा, टुकडा, चक्रदार, लग्गी, परन इत्यादी वादन प्रकारांचे सादरीकरण.	२.२ इयत्ता ११वीच्या सर्व तालांची माहिती सांगणे व ताल वाजवणे.	२.३ इयत्ता ११ वीचे सर्व ताल हातावर टाळी व खाली दाखवून म्हणणे.
३	**स्वतंत्र तबलावादन लहरा साथीबरोबर सादर करणे**	३.१ त्रिताल	३.२ झपताल	
४	**विविध तालवाद्य वादन**	४.१ पखवाज वादन	४.२ ढोलकी वादन	
५	**साथसंगत**			
६	**प्रात्यक्षिक नोंदवही**	प्रात्यक्षिकांची नोंद करणे. **(या घटकासाठी स्वतंत्र वही तयार करून त्यामध्ये अभ्यासक्रमातील विविध ताल व इतर वाद्यवादनांविषयी नोंद करणे अपेक्षित आहे.)**		

१. संगीत शिक्षण (पारंपरिक व आधुनिक)

१.१. गुरुशिष्य परंपरा व आधुनिक संगीत शिक्षण पद्‌धती

"गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः।
गुरुः साक्षात् परं ब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः।"

भारतीय संस्कृतीतील विविध कलांचे संवर्धन करण्यासाठी महान गुरु शिष्य परंपरा अगदी प्राचीन काळापासूनच आपल्या देशात अस्तित्वात आहे. अगदी पुरातन रामायण, महाभारत काळापासून गुरुकुलात प्रतिभाशाली विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना पारंगत केले जात असे.

भारतीय संगीतात गुरु-शिष्य परंपरेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. गुरु-शिष्य परंपरेपासून आधुनिक संगीत शिक्षणाचा प्रवास कशा पद्‌धतीने झाला तो खालील मुद्द्यांच्या आधारे पाहता येईल.

गुरु-शिष्य परंपरा :

गुरूंना पूर्वी संगीत क्षेत्रात खूप मानाचे स्थान होते. अनेक राजे-महाराजे व बादशहांना आपल्या दरबारात मोठे संगीत तज्ज्ञ आहेत याचा अभिमान वाटत असे. अशा थोर गुरूंचे अनेक राजांनी व बादशहांनी शिष्यत्व पत्करले. राजाश्रय लाभल्यामुळे हे कलावंत रात्रंदिवस संगीत साधना करून विद्यादान करत असत.

शिक्षणासाठी अनेक शिष्यांना पायपीट करावी लागे. अखंड परिश्रम करून गुरुसेवा करून गुरूंची मर्जी संपादन करावी लागत असे. शिष्यांना गुरूंच्या समोर बसून विद्या ग्रहण करावी लागे. या काळात ग्रंथांची उपलब्धता व संगीत जतन करून ठेवण्याची काही सोय नसल्यामुळे शिष्यांना गुरुकुल पद्‌धतीशिवाय पर्याय नव्हता.

गुरुगृही राहून प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतरच या शिष्याला आपली कला सादर करण्याची अनुमती मिळत असे.

अगदी प्राचीन काळापासून आजही गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व आहे. सर्व ललित कलांपैकी संगीत ही अशी एकमेव कला आहे की जी गुरूमुखातूनच घ्यावी लागते. स्वरतालाचे ज्ञान, आवाज व स्वर लावण्याचे तंत्र, राग विस्ताराची पद्‌धत अशा अनेक बाबी गुरूच समजावून सांगू शकतो. त्यामुळे आजही संगीतात गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व टिकून राहिले आहे.

१४ व्या शतकाच्या उत्तरार्धात घराण्यांचा उदय झाला. घराण्यांच्या उदयामुळे संगीतक्षेत्र ढवळून निघाले. शास्त्रीय गायन व त्यातल्या त्यात ख्यालगायनाचा प्रचार होऊ लागला.

आधुनिक संगीत शिक्षण पद्‌धती :

इंग्रजांनी भारतीय कला व संगीताची उपेक्षा केल्यामुळे कलावंतांना संस्थानिकांचा अथवा कोठ्यांचा आधार घ्यावा लागला. अशा काळात महाराष्ट्रात दोन तेजस्वी तारे जन्माला आले. ते तारे म्हणजेच पं. वि. ना. भातखंडे व पं. वि. दि. पलुस्कर. पं. वि. दि. पलुस्कर यांनी ५ मे १९०१ रोजी लाहोर येथे गांधर्व महाविद्यालयाची स्थापना केली. या पाठोपाठ पं.वि.ना. भातखंडे यांनीही मॉरिस कॉलेज, माधव संगीत विद्यालय, भारतीय संगीत विद्यालय अशा विद्यालयांची सुरुवात केली. या विष्णुद्वयांनी भारतीय संगीतात शास्त्र व क्रियात्मक संगीत यांचा समन्वय घडवून आणला. शास्त्रशुद्‌ध स्वरलेखन करून अनेक ग्रंथांची निर्मिती केली. स्वरलिपीची निर्मिती करून भारतीय संगीत जिवंत ठेवले. अशा प्रकारे पं.पलुस्कर व पं. भातखंडे यांनी संगीतासाठी सर्वस्व अर्पण केले.

गुरु-शिष्य परंपरा मागे पडत असतानाच संगीत विद्यालयाच्या माध्यमातून आज संगीताचा प्रसार होत आहे. अनेक संगीत विद्यालयांतून संगीताचे शिक्षण देणे चालू आहे. परीक्षा पद्‌धती, त्याला अनुरूप अभ्यासक्रम यामुळे आज संगीत घराघरात जाऊन पोहोचले आहे. अनेक संगीत संस्थांकडून संगीताच्या परीक्षा घेतल्या जात आहेत. यामुळे अनेक कानसेन व तानसेन निर्माण होत आहेत.

आधुनिक काळामध्ये गुरुकुल पद्धतीबरोबरच परीक्षा पद्धती अस्तित्वात आली त्यामुळे एका गुरूकडे अनेक शिष्य एकाच वेळी शिकू लागले. अभ्यासक्रम वेळेमध्ये पूर्ण करण्याकडे गुरूंचा अधिक कल राहिला. श्रोत्यांची अभिरुची लक्षात घेता कलाकाराला विविध गीतप्रकार सादर करण्याची गरज निर्माण झाली. त्यामुळे आधुनिक काळामध्ये एक शिष्य वेगवेगळ्या गुरूंकडे वेगवेगळे गीतप्रकार शिकू लागला. थोडक्यात आधुनिक काळामध्ये एकाच गुरूकडे अनेक शिष्य आणि एक शिष्य अनेक गुरूंकडे संगीताची तालीम घेऊ लागला. त्यामुळे घराण्याच्या भिंती अस्पष्ट झाल्या.

आजकाल Online शिक्षण पद्धतीही अस्तित्वात आली आहे. एकमेकांपासून दूर अंतरावर असलेले गुरू Online शिक्षण पद्धतीने शिष्याला गायन, वादन, नृत्य शिकवताना दिसतात. Head Phone च्या माध्यमातून दूर अंतरावरील गुरूंचे संगीतातील बारकावे शिष्य आत्मसात करू शकतो. तसेच शिष्याच्या गाण्यातील त्रुटी गुरू सुधारू शकतो. त्यामुळे अत्यंत सोयीची अशी ही शिक्षण पद्धती आजकाल लोकप्रिय होताना दिसते.

मौखिक परंपरा :

आजही संगीत शिक्षण मौखिक परंपरेतून चालू आहे. आज बाजारात कितीही संगीत पुस्तके उपलब्ध झाली तरी संगीतातील सौंदर्यस्थळांचा वापर प्रत्यक्ष गुरूंकडूनच आत्मसात करावा लागतो.

शालेय शिक्षण :

आज प्राथमिक शाळांपासून विद्यार्थ्यांना संगीताची ओळख करून दिली जात आहे. यात अलंकार, प्रार्थनागीते, समूहगीते इत्यादी शिकवले जात आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर संगीत हा विषय ऐच्छिक आहे. त्यातून हजारो विद्यार्थी दरवर्षी संगीताचे शिक्षण घेत आहेत. विद्यापीठ स्तरावरसुद्धा संगीत विषय शिकवला जात आहे. यातून विद्यार्थ्यांना बी. ए. एम. ए. व पी.एच.डी इत्यादी पदव्या मिळत आहेत. यातूनच संगीत शिक्षक, अधिष्ठाता अशा पदांची निर्मिती झाली.

आधुनिक गुरुकुल पद्धती :

गुरु-शिष्य परंपरा टिकवून ठेवण्यासाठी केंद्रशासनाबरोबरच राज्यसरकारसुद्धा प्रयत्नशील आहे. काही निवडक शहरांमध्ये संगीत कलेचे संवर्धन होण्यासाठी गुरुकुलांची सुरूवात केलेली आहे. यात शासनाकडून गुरूंची नियुक्ती केली जाते. तर पात्र विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना शिष्यवृत्ती देऊन संगीत शिकण्याची सोय केली जाते. याचबरोबर काही दिग्गज कलावंतानी सुद्धा गुरुकुलांची स्थापना केलेली आहे. या गुरुकुलांतून विद्यार्थ्यांच्या संगीत शिक्षणाबरोबरच भोजन, निवासाची सोय केली जाते. तसेच विद्यार्थ्यांना आवडेल त्या गुरूकडे शिक्षण घेता येते. अशा विद्यार्थ्यांना ग्रंथालय, ध्वनीफितींचा संग्रह, रेकॉर्डिंगचे तंत्र, विविध चर्चासत्रे, शिबिराचे आयोजन व अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अशा सोयी पुरवल्या जातात.

आज शासन, सामाजिक संस्था व थोर कलावंत पुढाकार घेऊन शहरांबरोबरच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संगीत शिक्षण देण्याचा व गुरु-शिष्य परंपरा जोपासण्याचा प्रयत्न करीत आहेत.

हे जाणून घ्या

गुरु-शिष्य परंपरा

गुरु	शिष्य
स्वामी हरिदास	मियाँ तानसेन
वासुदेवबुवा जोशी	बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर
बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर	वि. दि. पलुस्कर
अब्दुल करीम खाँ	सवाई गंधर्व
सवाई गंधर्व	भीमसेन जोशी
मोगुबाई कुर्डीकर	किशोरी आमोणकर

१.२ आधुनिक संगीत शिक्षणात विज्ञानाचा सहयोग

आज विज्ञानामुळे अनेक शोध लागलेले आहेत. संगीत शिक्षणात विज्ञानाचा सहयोग खालील मुद्द्यांच्या आधारे पाहता येईल.

१) **मुद्रणकलेचा शोध :** गुरु-शिष्य परंपरेत शिष्य गुरुमुखातूनच विद्या ग्रहण करीत असे. गुरूच्या जवळ राहून गुरू जे शिकवतील त्याचे मनन व चिंतन करणे व त्याचा रियाज करणे या स्वरूपाची पद्धत प्रचलित होती. त्या काळी संगीत जतन करून ठेवण्याची सोय नव्हती. कॉस्टर नावाच्या एका डच माणसाने मुद्रणकलेचा शोध लावला. साधारणतः २० व्या शतकात भारतात मुद्रणकला अस्तित्वात आली. त्यामुळे संगीतातील दुर्मीळ बंदिशी, स्वरलिपी व इतर सांगीतिक साहित्य जतन करून ठेवण्याची सोय झाली. पुस्तकांच्या माध्यमातून संगीत सुरक्षित ठेवण्याच्या प्रयत्नामुळे संगीत साधकांना याचा लाभ झाला. पुढे संगणकाचा शोध लागला. त्याचाही फायदा ग्रंथनिर्मितीला होऊ लागला. विविध फॉन्ट्स, चित्रे, आकृत्या इत्यादींच्या वापराने मुद्रण सुबक व आकर्षक होऊ लागले. एवढेच नाही तर संगणकाच्या माध्यमातून ग्रंथ जतन करून ठेवता येऊ लागले. अशा प्रकारे मुद्रणकला संगीत शिक्षणात वरदान ठरली.

२) **ध्वनिक्षेपक :** विज्ञानाने ध्वनिक्षेपकाचा शोध लावला. त्यामुळे संगीत शिक्षकांचा ताण कमी झाला. संगीतातील बारकावे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचू लागले. या यंत्रामुळे एकाच वेळी असंख्य विद्यार्थ्यांना गाणे ऐकता येऊ लागले. पूर्वी विद्यार्थ्यांना सादरीकरणातील त्रुटी समजत नव्हत्या. परंतु आता मॉनिटरच्या माध्यमातून त्यांना याची जाणीव होते. अशा प्रकारे गायन-वादनातील त्रुटी निवारण्यासाठी अत्याधुनिक ध्वनिक्षेपकाचा उपयोग शिक्षण क्षेत्रात केला जात आहे.

३) **ध्वनिमुद्रणाची सोय :** आज संगणकाच्या माध्यमातून विविध ट्रॅक्सचा वापर करून ध्वनिमुद्रणाचे काम केले जात आहे. त्यामुळे विद्यार्थी स्वतःचे गाणे ध्वनिमुद्रित करून आत्मपरीक्षणाद्वारे त्यामध्ये सुधारणा करु शकतो.

४) **दृकश्राव्य माध्यमांचा सहयोग :** दूरदर्शन हे एक दृकश्राव्य माध्यम आहे. ज्याच्या माध्यमातून आपण एखादा कार्यक्रम ऐकू व पाहू शकतो. दूरदर्शन आज खेडोपाडी जाऊन पोहोचले आहे. पूर्वी दूरदर्शनवर राष्ट्रीय व प्रादेशिक वाहिन्या अस्तित्वात होत्या. परंतु आज विविध कंपन्यांनी अनेक वाहिन्या सुरू केल्या आहेत. त्यामुळे संगीत साधकांना त्याचा फायदा होत आहे. दूरदर्शनवरून संगीतातील विविध प्रकारांचा आस्वाद घेता येतो. तसेच विविध रिॲलिटी शोजमधून नवोदित कलावंताना व्यासपीठ मिळत आहे.

५) **संगणक :** संगणकामुळे संगीतक्षेत्रातसुद्धा क्रांती घडून आली. आपण हवे ते संगीत यात साठवून ठेवू शकतो. इंटरनेटच्या माध्यमातून जगातील अनेक संगीतप्रकार घरबसल्या ऐकू व पाहू शकतो. विविध संकेतस्थळांवरून (वेबसाईट) आपण आपल्याला आवडेल ते संगीत, संगीतकार, कलाकारांची माहिती प्राप्त करू शकतो. अशा विविध वैशिष्ट्यांमुळे संगणकही संगीत शिक्षणात अत्यंत मोलाची भूमिका पार पाडत आहे.

६) **चित्रीकरणाची सोय :** चित्रीकरणाच्या सोयीमुळे आपण आपल्या आवडत्या गायक, वादक व नर्तकाला जवळून पाहू शकतो. संगीत महोत्सवात हजारो श्रोते उपस्थित असतात. मागे बसलेल्या श्रोत्याला मंचावरील कलाकाराचे ऐकू येते. परंतु गायन अथवा वादन क्रिया किंवा नर्तकाच्या भावमुद्रा तो दूरवरून पाहू शकत नव्हता. आज विज्ञानाने चित्रीकरणासाठी उच्च दर्जाचे कॅमेरे दिलेले आहेत. त्यामुळे स्क्रीनवरून आपण अगदी मागे बसूनसुद्धा या सर्व बाबींचा आस्वाद घेऊ शकतो. सांगीतिक आस्वादाबरोबरच स्वमूल्यमापनासाठी चित्रीकरण हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरले आहे.

७) **मोबाईल (भ्रमणध्वनी) :** आज शहरापासून ते खेड्यापर्यंत भ्रमणध्वनीचा प्रसार झालेला आहे. या साधनांद्वारे जगातील व्यक्तींशी संपर्क तर होतोच. परंतु संगीत अध्ययनासाठी हे साधन उपयुक्त ठरत आहे. भ्रमणध्वनीतील मेमरी कार्डमुळे आपण यात अनेक गीतप्रकार साठवून ठेवू शकतो. यात ध्वनिमुद्रण व

चित्रीकरणाची सोय असल्यामुळे विविध संगीत प्रकार आपण रेकॉर्ड करू शकतो. संगणकाची सर्वच वैशिष्ट्ये या छोट्याशा मोबाईलमध्ये आहेत. संगीत अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी व रसिक श्रोत्यांसाठी हे उपयुक्त माध्यम ठरत आहे. तानपुरा, तबला, लहरा अशा विविध ॲप्समुळे (App.) मोबाईलचा रियाजासाठी देखील उपयोग केला जातो.

८) **इलेक्ट्रॉनिक वाद्ये :** विज्ञानाच्या प्रगतीमुळे इलेक्ट्रॉनिक वाद्यांची निर्मिती झाली. यामध्ये इलेक्ट्रॉनिक तानपुरा, तालवाद्य, तबला व लहेरा यंत्र यांचा समावेश होतो. या शोधांमुळे संगीताच्या अभ्यासकांची मोठी सोय झाली आहे. ही यंत्रे आकाराने लहान आहेत. त्यामुळे ते आपण कोठेही घेऊन जाऊ शकतो. आपणास हव्या त्या स्वरात ही यंत्रे लावता येतात. त्यामुळे रियाजाबरोबर मैफिलीतही ही वापरली जात आहेत. ही सर्व वाद्ये विजेवर वा बॅटरीवर चालतात.

थोडक्यात असे म्हणता येईल की विज्ञानाच्या प्रगतीमुळे संगीत शिक्षण सुलभ झाले आहे. तसेच संगीत रसिकांसाठी विज्ञानाने अनेक दरवाजे उघडून दिलेले आहेत. या सर्वच साधनांचा वापर करून आपण संगीतात आमूलाग्र बदल घडवून आणू शकतो.

स्वाध्याय

प्र.१ स्वमत लिहा.


(१) संगीत अध्ययनासाठी आधुनिक शिक्षण पद्धतीबद्दल तुमचे मत स्पष्ट करा.

(२) 'संगीत शिक्षण पद्धतीत गुरूंचे महत्त्व' याविषयी तुमचे मत लिहा.

(३) संगीतशिक्षणात विज्ञानाचा सहयोग तारक की मारक? आपले मत लिहा.

प्र.२ आकृतिबंध पूर्ण करा.

(१)



प्र.३ तुलना करा.

(१) पारंपारिक संगीत शिक्षण पद्धती – आधुनिक संगीत शिक्षण पद्धती

(२) पारंपरिक वाद्ये – इलेक्ट्रॉनिक्स वाद्ये

स्वनिर्मिती

(१) इंटरनेटद्वारे एखादा राग अथवा ताल शिकून वर्गात सादर करा.

(२) तुमचे एखादे गाणे मोबाईलमध्ये ध्वनिमुद्रित करा.

(३) तुम्ही सादर केलेला एखादा राग अथवा ताल मोबाईलमध्ये चित्रित करून एडिट करा.

उपक्रम

(१) सांगीतिक शिक्षणासंदर्भातील विविध ॲप्स मोबाईलमध्ये डाऊनलोड करा.

(२) संगीत शिक्षण देणाऱ्या विविध संकेतस्थळांचा शोध घ्या व त्यांची सूची तयार करा.

(३) दूरदर्शनच्या विविध वाहिन्यांवरून प्रसारित होणाऱ्या सांगीतिक कार्यक्रमांचा शोध घ्या व वाहिन्यांनुसार कार्यक्रमाची सूची तयार करा.



२. भारतीय संगीताचा इतिहास



सर्व ललित कलांमध्ये संगीत कलेचा उदय सृष्टिनिर्मितीबरोबरच झाला. सामाजिक परिवर्तने व संगीतातील परिवर्तन जणू हातात हात घालूनच चालत असल्याचे दाखले इतिहासात सापडतात. भारतीय संगीताच्या इतिहासाचे अध्ययन करण्यासाठी इतिहासाचे चार कालखंड करता येतील.

१) आदिम कालखंड

२) प्राचीन कालखंड

३) मध्ययुगीन कालखंड

४) अर्वाचीन कालखंड - अर्वाचीन कालखंडाचे दोन उपकालखंड करता येतील.

अ) स्वातंत्र्यपूर्व कालखंड

ब) स्वातंत्र्योत्तर कालखंड

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भारतीय संगीताचा इतिहास व विकास कशा पद्धतीने झाला हे पुढीलप्रमाणे पाहता येईल.

२.१ स्वातंत्र्यपूर्व कालखंड (१८५०-१९४७)

भारतीय संगीताचे खरे स्वरूप विकसित झाले ते १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातच. स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय संगीताची स्थिती अभ्यासण्यासाठी आपल्याला भूतकाळात डोकवावे लागेल.

१) **ब्रिटिशांच्या काळातील संगीत :** भारतीय संस्कृती व भारतीय कला यांकडे इंग्रजांनी कधीही लक्ष दिले नाही. त्यामुळे संगीत कलेला त्यांच्याकडून राजाश्रय मिळाला नाही आणि संगीत समाजातील कनिष्ठ लोकांच्या हातात गेले. लोकांचा संगीताकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. सुसंस्कृत घरात संगीताचे नाव घेणे सुद्धा पाप ठरू लागले. काही गुणी व्यक्तींनी संगीत कलेची ज्योत आपल्या परिश्रमाने तेवत ठेवली.

२) **ब्रिटिश काळात संगीताचे संवर्धन :** भारतीय संगीताचा मळा फुलवण्यासाठी काही कलावंत व संस्थानिकांनी अहोरात्र कष्ट घेतले. देशात ग्वाल्हेर, बडोदा, रामपूर, मेहर अशी छोटी छोटी संस्थाने होती. या संस्थानिकांनी अनेक कलावंतांना दरबारी गायक म्हणून नियुक्त केले. यातूनच संगीतातील प्रमुख घराणी जन्माला आली. इंग्रज शासकांनी भारतीय संगीत कलेची उपेक्षा केली असली तरीही सर विलियम जोन्स, कॅप्टन डे, कॅप्टन विलार्ड यासारख्यांनी कुतूहलापोटी भारतीय संगीताचे अध्ययन केले व त्यावर अनेक ग्रंथ लिहिले. पर्यायाने लोकांचा संगीताकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलू लागला.

३) **ब्रिटिश काळातील ग्रंथ निर्मिती :** जयपूरचे राजे प्रतापसिंह यांनी संगीत कलावंताच्या मदतीने 'संगीत सार' या ग्रंथाची निर्मिती केली. यामुळे संगीताला शास्त्रीय बैठक मिळाली. महमद रझा यांनी 'नगमाते आसफी' हा ग्रंथ लिहिला. कृष्णानंद व्यास यांनी 'संगीत रागकल्पद्रुम' नावाचा ग्रंथ लिहिला. ज्यामध्ये हजारो धृपदे, ख्याल आणि अन्य गीते समाविष्ट केली. सुरेंद्र मोहन टागोर यांनी 'युनिव्हर्सल हिस्टरी ऑफ म्युझिक' आणि 'म्युझिक फ्रॉम व्हेरिअस ऑथर्स' हे संगीतविषयक ग्रंथ लिहून संगीताला समृद्ध करण्याचा प्रयत्न केला.

४) **पं. पलुस्कर व पं. भातखंडे यांचे योगदान :** ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीत भारतीय संगीत लयाला जात असतानाच महाराष्ट्रातील दोन थोर विभूतींनी संगीत क्षेत्रात कार्य केले ते म्हणजेच पं. विष्णु दिगंबर पलुस्कर व पं. विष्णु नारायण भातखंडे होय

५) **संगीत संस्थांची स्थापना :** स्वातंत्र्यपूर्व काळात संगीताचा प्रसार होण्यासाठी अनेक कलावंतानी संगीत संस्थांची स्थापना केली. अब्दुल करिम खाँ यांनी 'आर्यसंगीत विद्यालय', पं. गजाननबुवा जोशी यांनी 'शिवानंद संगीत प्रतिष्ठान' स्थापना केले. याचबरोबर गायनोत्तोजक मंडळी, 'पुणे गायन समाज', 'भारत गायन समाज' अशा अनेक संगीत मंडळांनी अनेक मैफिली घडवून आणल्या व संगीताच्या प्रसारासाठी मोलाचे योगदान दिले.

२.२ स्वातंत्र्योत्तर कालखंड

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनेक छोटी-छोटी संस्थाने संघराज्यात विलीन झाली. याचाच परिणाम म्हणून पूर्वी जे संगीत तज्ज्ञ राजाश्रयी होते ते लोकाश्रयी झाले. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी उपेक्षित असलेल्या संगीताला स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शासन आणि जनतेने पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न केला ते पुढीलप्रमाणे.

१) **शासनाकडून संगीताचे संवर्धन :** कलावंतांना संस्थानिकांचा जरी राजाश्रय मिळाला नाही तरी शासनाने त्यांना संरक्षण दिले. संगीत कलावंताना प्रोत्साहन देण्यासाठी राष्ट्रपती पदक देऊन गौरवले जाऊ लागले. संगीत नाटक अकादमी व ललित कला अकादमीची स्थापना झाली. संगीत क्षेत्रातील नवोदित कलावंतांना शासनाकडून शिष्यवृत्त्या दिल्या जाऊ लागल्या.

२) **लोककलावंताना राजाश्रय :** भारतीय संगीताचे मूळ हे लोकसंगीतात आहे. संस्कृतीचा आरसा असलेल्या लोककलांचे संवर्धन करण्याची जबाबदारी शासनाने उचलली. महाराष्ट्रातील अस्सल लोककला प्रकार लावणी, भारूड, गोंधळ, पोवाडा अशा कलाविष्कारांना लोकमान्यता नव्हती. म्हणूनच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शासन दरबारी यांची नोंद घेतली. अशा कलावंतांना मानधन देऊन कला जतन केली. याचबरोबर कुमार गंधर्वांनी लोकसंगीताचा अभ्यास करून नवीन रागांची निर्मिती केली.

३) **संगीतविषयक ग्रंथांची निर्मिती :** स्वातंत्र्यानंतर क्रियात्मक व तात्त्विक या विषयांवर अनेक ग्रंथांचे लेखन झाले. आचार्य बृहस्पती यांचे राग रहस्य, भरत का संगीत सिद्धांत, पं. कुमार गंधर्व यांचे अनुपराग विलास, पं. विनायकबुवा पटवर्धन यांचे रागविज्ञान याचबरोबर पं. वामनराव देशपांडे, अशोक रानडे, स्वामी प्रज्ञानंद यांच्यासह अनेक लेखकांनी ग्रंथलेखन करून भारतीय संगीत साहित्य समृद्ध केले.

४) **दृक-श्राव्य माध्यमे व संगीत विकास :** दृक-श्राव्य माध्यमांनी संगीतक्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणले. रेडिओच्या माध्यमातून संगीतसाधकांसाठी अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येऊ लागले. होतकरू कलावंतांना प्रोत्साहन देण्यासाठी स्पर्धा घेण्यात येऊ लागल्या. आकाशवाणी, दूरदर्शनवरून संगीतावर आधारित कार्यक्रम सादर होऊ लागले. दूरदर्शनवरून विविध संगीत समारोहांचे प्रत्यक्ष प्रक्षेपण केले जाते. दूरदर्शनवरून spirit of Unity concerts for Universal Integration यांसारखे अनेक कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरत आहेत. आकाशवाणी व दूरदर्शनवरून अखिल भारतीय संगीत सभा प्रसारित होतात.

५) **संगीत महोत्सवांचे आयोजन व पुरस्कार :** शासन, संगीत संस्था, सामाजिक व सांस्कृतिक संस्था यांच्या वतीने अनेक संगीत महोत्सवांचे आयोजन होत आहे. पुण्यातील सवाई गंधर्व महोत्सव, पुणे फेस्टिव्हल, वेरूळ महोत्सव, बाणगंगा महोत्सव, तानसेन संगीत समारोह अशा अनेक संगीत महोत्सवांच्या माध्यमातून भारतीय संगीत जनमानसात रुजवण्याचे काम होत आहे. आय. टी. सी. कंपनीकडून कोलकाता येथे नॅशनल रिसर्च ॲकॅडमी तर टाटा कंपनी नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टस् अकादमीची स्थापना करून संगीत जोपासण्याचा प्रयत्न होत आहे. सूरसिंगार संसदेकडून सूरमणी हा किताब देण्यात येतो. त्याचबरोबर भारत सरकारकडून प्रोत्साहन म्हणून विविध पुरस्कार देऊन गौरवण्यात येते. जसे; पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण, भारतरत्न.

६) **शालेय शिक्षण व संगीत :** स्वातंत्र्य प्राप्तीनंतर संगीत विषयाचा प्रसार होण्यासाठी शालेय शिक्षणात संगीत विषय अनिवार्य केला आहे. शाळांबरोबरच महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर आज संगीत विषय शिकवला जात आहे. विविध संगीत संस्थांच्यावतीने गायन, वादन व नृत्य विषयांच्या परीक्षा घेतल्या जातात. यामुळे अनेक विद्यार्थी कलाकार म्हणून पुढे येत आहेत.

७) **वैज्ञानिक शोध व संगीत :** आधुनिक काळात रेडिओ, टेपरेकॉर्डर व दूरदर्शनबरोबरच आज संगणक व इंटरनेटमुळे घराण्यांची बंधने शिथिल झाली आहेत. इलेक्ट्रॉनिक्स वाद्यांच्या निर्मितीने संगीतक्षेत्रात आमूलाग्र बदल घडले. इलेक्ट्रॉनिक्स तानपुरा, लहेरा यंत्र, इलेक्ट्रॉनिक्स तबला, हवाई गिटार, सिंथेसायझर अशा वाद्यांच्या निर्मितीमुळे संगीतशिक्षणात क्रांतीची

लाट उसळली. याचबरोबर ध्वनिमुद्रण, ध्वनिविस्तारक यंत्रे अशा अत्याधुनिक तंत्रांचा वापर केल्यामुळे वाद्ययंत्राच्या सादरीकरणात मींड, गमक, खटका यासारख्या अलंकारिक बाबींच्या पेशकारीवर प्रभाव पडला आहे. याशिवाय संगीतात संशोधन करण्याच्या दृष्टीने सौंदर्यशास्त्र, संगीत व रोग चिकित्सा, संगीत व योग, संगीत व अध्यात्म, संगीत व मनोविज्ञान, संगीताचा इतिहास, घराणे अशा अनेक विषयांवर शोधकार्य सुरू आहे. ज्या माध्यमातून अनेक ग्रंथ जन्माला येत आहेत. संगीत, संगीत कलाविहार, बागीश्वरी, धृपद वर्णिकी, इंडियन म्युझिक जर्नल, छायानट, संगीत सेतू अशी अनेक संगीतविषयक मासिके संगीताच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत आहेत.

स्वाध्याय

प्र.१ योग्य जोड्या जुळवा.

अ.क्र.	'अ'	'ब'
१	संगीत सार	महंमद रझा
२	संगीत रागकल्पद्रुम	कुमार गंधर्व
३	म्युझिक फ्रॉम व्हेरिअस ऑथर्स	आचार्य बृहस्पती
४	अनुपराग विलास	कृष्णानंद व्यास
५	नगमाते आसफी	जयपूरचे राजे प्रतापसिंह
६	राग रहस्य	सुरेंद्र मोहन टागोर
७	राग विज्ञान	विनायकबुवा पटवर्धन

प्र.२ 'स्वातंत्र्यपूर्व काळातील संगीताची स्थिती' याविषयी माहिती लिहा.

प्र.३ भारतीय संगीत जनमानसात कोणकोणत्या माध्यमांतून रुजवले जात आहे, याविषयी अधिक माहिती मिळवा.

प्र.४ थोडक्यात उत्तरे लिहा.

(१) भारतीय संगीताच्या अभ्यासासाठी महत्वाचे चार कालखंड कोणते ?

(२) स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये कोणत्या संगीतविषयक ग्रंथांची निर्मिती झाली ?

(३) संगीताच्या प्रसाराच्या दृष्टीने पं. वि. दि. पलुस्कर आणि पं. वि. ना. भातखंडे यांनी केलेल्या योगदानाचा आढावा घ्या.

(४) स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शासनाकडून संगीताच्या संवर्धनाच्या दृष्टीने कोणते प्रयत्न केले जात आहेत ?

प्र. ५ संगीताचा प्रसार होण्यासाठी कोणत्या योजना राबवता येतील, याविषयी तुमचे विचार मांडा.

उपक्रम : पं. वि. ना. भातखंडे व पं. वि.दि. पलुस्कर यांनी लिहिलेल्या पुस्तकांची नावे इंटरनेटवर शोधा.



३. सांगीतिक परिभाषा



३.१ आलाप :

रागाची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन विलंबित किंवा मध्यलयीत केलेला स्वरविस्तार म्हणजे 'आलाप' होय.

३.२ तान :

रागाची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन द्रुतलयीत केलेला स्वर विस्तार म्हणजे 'तान' होय.

३.३ बोल आलाप :

रागाच्या नियमानुसार बंदिशीमधील बोलांच्या आधारे म्हटलेल्या आलापांना 'बोल आलाप' म्हणतात.

३.४ बोलतान :

बंदिशीमधील बोलांच्या आधारे म्हटली जाणारी तान म्हणजे 'बोलतान'. बंदिशीमधील बोलांचा अंतर्भाव त्या तानेमध्ये करणे म्हणजे 'बोलताना' होय.

३.५ कणस्वर :

एक स्वर घेताना पुढच्या किंवा मागच्या स्वराला स्पर्श करण्याच्या क्रियेला 'कणस्वर' असे म्हणतात. जसे; राग भूपालीमध्ये धैवत घेताना षड्ज स्वराचा कणस्वर घेतला जातो. ग प $^{\text{सां}}$ध $^{\text{सां}}$ध सां

३.६ गमक :

स्वरांचे कंपन करून त्यांना वजन देण्याच्या क्रियेला 'गमक' असे म्हणतात.

३.७ झाला :

सतारीमध्ये चिकारी किंवा बाजाच्या तारांवर मिझराबद्‌वारा आघात करत 'दारारारा, दारारारा' हा प्रकार द्रुतलयीत वाजवण्याच्या या क्रियेला 'झाला' असे म्हणतात.

३.८ जाती :

स्वर संख्येच्या आधारावर रागाच्या तीन जाती पडतात. १. ओडव (५ स्वर), २. षाड्‌व (६ स्वर), ३. संपूर्ण (७ स्वर)

३.९ तोडा :

सरोद, सतार या वाद्यांवर वाजवल्या जाणाऱ्या तानांना 'तोडा' असे म्हणतात.

३.१० खटका :

चार किंवा चारपेक्षा अधिक स्वरांची गोलाई निर्माण करून द्रुत गतीत गायली जाते, त्यास 'खटका' असे म्हणतात. रेसाऩिसा, सारेऩिसा

३.११ मुर्की :

जवळजवळच्या २-३ स्वरांचा शीघ्रतेने आलटून पालटून प्रयोग करणे म्हणजे 'मुर्की'. $^{\text{धम}}$प, $^{\text{रेऩि}}$सा

३.१२ अलंकार :

आरोह-अवरोहयुक्त स्वरांच्या क्रमिक रचनेस 'अलंकार' असे म्हणतात. उदा. सारेग, रेगम, गमप, सांनीध, नीधप, धपम

३.१३ मींड :

एका स्वराकडून दुसऱ्या स्वराकडे घसरत जाताना मधल्या स्वरांना स्पर्श करून जाणे म्हणजे 'मींड' होय.
जसे, सां ‿ प

३.१४ न्यास :

गाताना किंवा वाजवताना रागामध्ये ज्या स्वरांवर थांबतो त्या स्वराला 'न्यास स्वर' म्हणतात.

३.१५ रजाखानी गत :

तत प्रकारच्या वाद्यांवर द्रुतलयीमध्ये वाजवल्या जाणाऱ्या गतीला 'रजाखानी गत' असे म्हणतात.

३.१६ : मसीतखानी गत :

तत प्रकारच्या वाद्यांवर विलंबित लयीमध्ये वाजवल्या जाणाऱ्या गतीला 'मसीतखानी गत' असे म्हणतात.

३.१७ मूर्च्छना :

गायन वादनात स्वरांची कोमल तीव्र रूपे सांभाळून क्रमवार स्वरसप्तक बनवणे म्हणजे 'मूर्च्छना' होय.

३.१८ जमजमा :

तंतूवाद्यावर मिझराबच्या (नखीच्या) एका आघातामध्ये एकाच वेळी दोन स्वर वाजवणे याला 'जमजमा' म्हणतात.

३.१९ बेहलावा :

आलापामध्ये घेतलेली मध्यलयीतील छोटी तान म्हणजे 'बेहलावा'.

३.२० पकड :

रागवाचक स्वरसमूहाला 'पकड' असे म्हणतात.

३.२१ घसीट

नखीने तार छेडल्यावर पडद्यावर ज्या स्वरावर बोट ठेवले असेल तेथूनच तार ओढून घसरत मिंड घेऊन स्वरांपर्यंत नेण्याच्या क्रियेला 'घसीट' म्हणतात.

३.२२ सूत

खालच्या स्वरावरून वरच्या स्वरावर किंवा वरच्या स्वरावरून खालच्या स्वरावर अनुनासिक उच्चारात मींड पद्धतीने स्वर म्हणणे ह्या क्रियेला 'सूत' म्हणतात.

३.२३ थाट

राग निर्मितीची क्षमता असलेल्या सप्त स्वरांच्या समूहाला 'थाट' असे म्हणतात.

स्वाध्याय

प्र. १ रिकाम्या जागा भरा.

(१) गाताना किंवा वाजवताना ज्या स्वरावर आपण थांबतो त्याला .... म्हणतात.

(२) आलापामध्ये घेतलेली छोटीशी तान म्हणजे .... होय.

प्र. २ खालील पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या लिहा.

(१) कणस्वर

(२) खटका

(३) गमक

(४) मींड

(५) थाट

(६) जमजमा

प्र. ३ खालील पारिभाषिक शब्दांमधील फरक १/१ वाक्यात लिहा.

(१) आलाप–ताना

(२) मसीतखानी गत– रजाखानी गत

(३) तान– बोलतान

(४) मुर्की– बेहेलावा

४. गायन

४.१ शास्त्रीय संगीत

ख्याल

लोकप्रिय असलेला धृपद-धमार हा गीतप्रकार काळाच्या ओघात मागे पडला व त्याची जागा ख्याल गायनाने घेतली. ख्याल ही शृंगाररसपूर्ण, मधुर व शांत गायकी असल्यामुळे आजही ख्यालगायकी लोकप्रिय आहे. या गीतप्रकाराची माहिती खालील मुद्द्यांच्या आधारे घेता येईल.

अर्थ व व्याख्या :

ख्याल हा पर्शियन शब्द आहे. पर्शियन भाषेत ख्यालाचा अर्थ विचार किंवा कल्पना असा होतो. स्वत:च्या प्रतिभेने मुक्तपणे स्वर, ताल आणि शब्द यांच्या माध्यमातून रागाचे नियम सांभाळून सादर केलेला गीतप्रकार म्हणजेच ख्याल असे ख्यालाबद्दल स्थूलमानाने म्हणता येईल.

उगम :

तेराव्या शतकापर्यंत उत्तर भारतीय आणि दक्षिण भारतीय संगीत असे भेद झालेले नव्हते. शारंगदेवांच्या काळातील साधारण गीती या प्रकारात ख्याल गायकीची बीजे सापडतात.

ख्याल हा स्वरप्रधान गीतप्रकार आहे. आलाप, ताना, बोलआलाप, बोलताना इत्यादी अलंकारीक बाबींनी ख्याल नटवला जातो.

ख्यालाचा विषय :

ख्याल गायनाचा विषय ईशस्तुती, राजाची स्तुती, ऋतुवर्णन, शृंगाराच्या विविध छटा, बोधपर वचने इत्यादी असतात. ख्याल हा ब्रज, हिंदी, पंजाबी, मराठी व उर्दू भाषेत असतो. त्याची बंदिश संक्षिप्त असते. ख्यालाचे दोन प्रकार पडतात. (१) बडा ख्याल (२) छोटा ख्याल. बडा ख्याल विलंबित लयीत सादर केला जातो . त्यामुळे तो विलंबित एकताल, झुमरा, तिलवाडा व तीनताल इत्यादी तालांत गायला जातो तर छोटा ख्याल त्रिताल, मध्य व द्रुत एकताल, झपताल, आडा चौताल व रूपक अशा तालांत गायला जातो. ख्यालाच्या साथीसाठी तंबोरा, तबला, हार्मोनियम, सारंगी, स्वरमंडल ही वाद्ये वाजवली जातात.

ख्याल गायक:

भारतीय अभिजात संगीतातील ख्याल गायकीला परमोच्च स्थानावर पोहोचवण्यासाठी अनेक कलावंतांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यात उ. फैयाज खाँ. पं. भास्करबुवा बखले, पं. वि. दी. पलुस्कर, पं. मल्लिकार्जून मन्सूर, पं. सवाई गंधर्व, गंगूबाई हनगल, हिराबाई बडोदेकर, मालिनी राजूरकर, पं. भीमसेन जोशी, पं. जसराज, पं. अजय चक्रवर्ती, डॉ. प्रभा अत्रे, किशोरी आमोणकर, वीणा सहस्त्रबुद्धे, वसंतराव देशपांडे इत्यादी गायक/गायिकांचा उल्लेख करणे क्रमप्राप्त ठरेल.

४.२ उपशास्त्रीय संगीत

ठुमरी :

उपशास्त्रीय संगीतातील एक शृंगाररसपूर्ण गीत प्रकार म्हणून ठुमरीचा उल्लेख करावा लागेल. ख्याल गायकीइतकाच लोकप्रिय असा हा गीत प्रकार आहे. पूर्वी ठुमरी शास्त्रीय संगीताच्या मंचावर दुय्यम प्रतीची मानली जात असे. आज मात्र संगीत मैफिलीत ठुमरीला मानाचे स्थान मिळाले आहे.

ठुमरीची वैशिष्ट्ये :

१. ठुमरी ही प्रामुख्याने दोन शैलींमध्ये गायली जाते. अ) पूरब अंगाची ठुमरी ब) पंजाबी अंगाची ठुमरी
२. ठुमरी ही शब्दप्रधान, भावनाप्रधान व शृंगाररसप्रधान गायनशैली आहे.
३. हिंदी, ब्रज, उर्दू, पंजाबी या भाषेत ठुमरीची काव्यरचना केलेली असते.
४. स्थाई व अंतरा या दोन भागात ठुमरी गायली जाते.
५. शृंगाररसाच्या विविध छटा, कृष्णाच्या रासलीला, विरहिणीची विरहकथा इत्यादी काव्यविषय यामध्ये असतात.
६. काही ठरावीक रागांमध्ये ठुमरी गायली जाते. त्यामध्ये पिलू, पहाडी, खमाज, मांड, काफी, देस, तिलंग, झिंझोटी, भैरवी इत्यादी रागांचा समावेश असतो.

ठुमरी गायनाची पद्धत :

ठुमरी गायनासाठी रागाचा आधार घेतलेला असला तरी राग नियमांचे काटेकोर पालन करण्याची आवश्यकता यात नसते. भावप्रदर्शन हा ठुमरी गायनाचा मुख्य हेतू असतो.

ठुमरी गायनात प्रथम स्थायी म्हटली जाते. त्यामध्ये बोलबनाव, बोलबांट या पद्धतीने ठुमरीला नटवले जाते. त्यानंतर अंतरा म्हटला जातो. गीताचे बोल वेगवेगळ्या पद्धतीने नटवून मुर्क्या, खटके, विविध हरकती व नजाकतीने ठुमरीची प्रस्तुती केली जाते. आलाप, तानांचा प्रयोग यात केला जात नाही. ठुमरी एक वैशिष्ट्यपूर्ण गायनशैली असल्यामुळे त्याची स्वतंत्र तालीम घेणे आवश्यक असते. ठुमरी गायनासाठी मधुर, चपळ व लवचीक अशा आवाजाची आवश्यकता असते. अंतऱ्याच्या शेवटच्या भागात पुन्हा स्थायी गाताना तबलावादक लग्गी, लडीचा उपयोग करतात त्यामुळे ठुमरी गायनाची रंगत वाढायला मोठी मदत होते. एकंदर लग्गीनंतर पुन्हा स्थाईची बंदीश गाऊन ठुमरी गायन संपवले जाते.

ठुमरी गायनाच्या साथीला तंबोरा, तबला, सारंगी, हार्मोनियम, व्हायोलिन अशी वाद्ये घेतली जातात.

ठुमरी गायक :

ठुमरी गायकी प्रसिद्ध करण्यामध्ये अनेक कलावंतांचे योगदान आहे. त्यामध्ये प्रामुख्याने ललनपिया, कदरपिया, बिंदादीन महाराज, बडे रामदास, सिद्धेश्वरी देवी, गिरीजादेवी, नैनादेवी, रसूलनबाई, बेगम अख्तर, शोभा गुर्टू, निर्मलादेवी, उ. बडे गुलाम अली, उ. बरकत अली, पं. जगदीशप्रसाद पंडीत या मागील पिढीतील गायकांबरोबरच आजच्या काळामध्ये उ. रशीद खाँ, पं.अजय चक्रवर्ती, डॉ. प्रभा अत्रे, पं. अजय पोहनकर, शुभा मुद्‌गल इत्यादी कलावंताचा उल्लेख करावा लागेल.

४.३ सुगम संगीत

गझल :

भारतीय संगीतामध्ये रुजलेला व लोकप्रिय गीतप्रकार म्हणून गझलचा उल्लेख करावा लागेल. भारतावर अनेक आक्रमणे झाली. त्यामध्ये मुस्लीम शासकांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. मुस्लीम शासकांच्या दरबारात अनेक कलावंत आश्रयाला राहात असत. त्या माध्यमातूनच 'गझल' हा गीत प्रकार भारतीय संगीतामध्ये समाविष्ट झाला.

गझलची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

गझल हा प्राचीन गीत प्रकार असून अरबी काळात या गीतप्रकाराची निर्मिती झाली. गझल हा उर्दू भाषेतील गीतप्रकार आहे. प्राचीन इराणमधील हा प्रेमगीतांचा प्रकार सूफी संतांच्या माध्यमातून भारतात रुजला.

गझलची वैशिष्ट्ये :

प्रेम, सौंदर्य वर्णन, ईश्वर व भक्ताचे नाते असे विविध काव्यविषय गझल या गीतप्रकारात असतात. भक्ती व शृंगाररसाचा मिलाप यात प्रकर्षाने आढळतो. यामध्ये शब्दांना विशेष महत्त्व दिले असल्यामुळे गझल हा शब्दप्रधान गीत प्रकार आहे. गझलमधील खास वैशिष्ट्य म्हणजे शेर होय. गझलचे अनेक चरण असून प्रत्येक दोन चरणांच्या खंडास 'शेर' असे म्हणतात. एका गझलमध्ये कमीतकमी पाच शेर असतात. शेरातील दोन सारख्या चरणांना मिळून 'मिसरा' म्हणतात. शेराच्या शेवटी येणाऱ्या सारख्या शब्दांना 'रदीफ' म्हणतात. रदीफच्या आधी येणाऱ्या व सारखे ध्वनी असणाऱ्या शब्दांना 'काफिया' म्हणतात. गझलच्या साथीसाठी हार्मोनियम, सारंगी, व्हायोलिन, संतूर, तबला इत्यादी वाद्ये वाजवली जातात.

गझल गायनाची पद्धत :

गझल हा गीत प्रकार आकर्षक अशा चालीमध्ये गायला जातो. गझल गायनाचा विस्तार काव्यामधील अर्थाच्या अनुषंगाने करावा लागतो. आलाप आणि तानांचा मुक्त उपयोग यामध्ये मोठ्या प्रमाणात केला जातो. दादरा, केरवा, रूपक इत्यादी तालांमध्ये गझल प्रामुख्याने गायली जाते.

फारसीतून मराठीत गझल आणण्याचे श्रेय माधव ज्युलियन यांना दिले जाते. यापूर्वी मणिकप्रभू आणि मोरोपंतांनीही हा काव्य प्रकार हाताळला होता. त्यानंतर प्रामुख्याने सुरेश भट हे नाव आदराने घेतले जाते.

गझल गायक :

जगजीतसिंह, बेगम अख्तर, शोभा गुर्टू, मेहंदी हसन, हरिहरन, गुलाम अली, पंकज उधास, भीमराव पांचाळे.

४.४ लोकसंगीत

पोवाडा :

महाराष्ट्रातील एक वीररसप्रधान लोकसंगीतातील गीतप्रकार म्हणजेच 'पोवाडा' होय. पोवाड्याला पवाडा



असेही म्हणतात. संस्कृत भाषेतील प्र + वद् = स्तुती करणे या धातूपासून पोवाडा शब्द निर्माण झाला आहे.

उगम :

दहाव्या शतकापासून विविध भाषांमध्ये स्तवनात्मक कवने रचली जात होती. त्यांना 'रासो' असे म्हणत असत. पोवाडा हेसुद्‌धा स्तवनात्मक काव्य आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रातील काही रोमहर्षक प्रसंग पद्यात वर्णन केले आहेत. तेही पोवाडा या प्रकारात जमा होतात.

पोवड्याचे सादरीकरण :

पोवाड्याची रचना लहान गद्यात्मक वाक्यांची आणि प्रवाही असते. त्याला पद्याची जोड दिलेली असते. पोवाड्याच्या बोलीभाषेत जिवंतपणा असतो. यातील चरण चार मात्रांच्या आवर्तनात गायले जातात. पोवाड्यातील परिच्छेदाला चौक ही संज्ञा असते. चरणाच्या शेवटी साथीदार जीऽ जीऽ ची जोड देत असतात. पोवाड्यातील घटनांत जिवंतपणा येण्यासाठी त्याचे केवळ निवेदन होत नाही तर त्याचे दर्शन घडवले जाते. श्रोत्यांना तो विषय समजावा यासाठी शाहीर त्यातील पात्रांच्या भूमिका साकारत असतो.

वेशभूषा व वाद्ये :

पोवाडा सादर करण्यासाठी शाहीर घेरदार बाराबंदी घालतो. खाली धोतर किंवा चुडीदार पायजमा परिधान करतो. डोक्यावर फेटा बांधलेला असतो. कमरेला शेला गुंडाळलेला असतो. गळ्यात कवड्यांच्या अथवा मोत्यांच्या माळा व कपाळावर कुंकवाची चंद्रकोर असते.

पोवाड्यात डफ हे प्रमुख वाद्य असते तसेच हार्मोनियम, ढोलकी, दिमडी, क्लॉरोनेट, ट्रॅंगल, झांज, घुंगरू, खंजिरी अशी वाद्ये साथीसाठी वापरली जातात. गायनाच्या साथीसाठी सहगायक/ गायिका असतात.

शाहिरांचे योगदान :

पेशव्यांच्या कारकिर्दीत शाहीर राम जोशी, अनंत फंदी, होनाजी बाळा, पठ्ठे बापूराव, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे इत्यादी शाहिरांनी मोलाचे योगदान दिले.

शाहीर पिराजी सरनाईक, कृष्णराव साबळे, किसनराव हिंगे, विठ्ठल उमप, बाबासाहेब देशमुख, अमर शेख यांनी पोवाडा हा लोकसंगीत प्रकार महाराष्ट्राच्या घराघरांत पोहोचवला.

स्वाध्याय

प्र. १ विविध गायकांनी गायलेले विविध गीतप्रकार लक्षपूर्वक ऐका आणि त्याची वैशिष्ट्ये समजून घ्या.

प्र. २ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

(१) ख्यालाच्या बंदिशीचे काव्य विषय कोणते?

(२) बडा ख्याल कोणकोणत्या तालांमध्ये गायला जातो?

(३) पोवाड्याच्या साथीसाठी कोणकोणती वाद्ये वापरतात?

(४) ठुमरी कोणकोणत्या रागांमध्ये गायली जाते?

प्र. ३ खालील गीतप्रकारांची वैशिष्ट्ये लिहा.

(१) ख्याल (३) गझल

(२) ठुमरी (४) पोवाडा

उपक्रम : इंटरनेटच्या सहाय्याने ख्याल गायक, ठुमरी गायक, गझल गायकांची, शाहिरांची अधिक माहिती मिळवा, तसेच परिसरातील प्रसिद्‌ध गायकांच्या, शाहिरांच्या मुलाखती/भेटी घ्या.



५. वादन



५.१ सतार

भारतीय वाद्यांना फार मोठी प्राचीन परंपरा लाभलेली आहे. काळाच्या ओघात काही नवीन वाद्ये उदयास आली. वर्तमानामधील प्रसिद्ध तंतुवाद्य म्हणून सतार या वाद्याचा उल्लेख करावा लागेल. सतारीला 'द क्वीन ऑफ इंडियन इंस्ट्रुमेंट्स' असे म्हणायला हरकत नाही.

सतार या भारतीय तंतुवाद्याला सितार, सेतार, सेतारा अशा विविध नावाने ओळखले जाते. या वाद्यांच्या उत्पत्तीबाबत विद्वानांमध्ये विभिन्न मते असल्याचे दिसून येते.



सतार या वाद्याची निर्मिती व त्यामधील परिवर्तने :

मध्य पूर्वेतील तंबूर व पंडोर या वाद्याशी सतारीचे नाते जोडले जाते. पुतळ्यांवर व मुद्रांवर अशा वाद्यांच्या प्रतिमा आढळतात. फारसी भाषेत याला तार, दुत्तार, सेह-तार (त्रितंत्री) इत्यादी नावे आहेत.

शारंगदेवांच्या संगीत रत्नाकर या ग्रंथात तीन तारांच्या वाद्याला त्रितंत्री असे म्हटले आहे. या वाद्यात कालानुरूप बदल होत गेले व सध्याची सात तारांची सतार विकसित झाली. संगीत समयसार या ग्रंथात सितार हेच नाव आहे. सेहतार या काश्मिरी वाद्याशी वर्तमानमधील सतारीचे बरेचसे साम्य आढळते. याच बरोबर 'उद' या पर्शियन वाद्याशीही सतारीचे साम्य आढळते. अमीर खुसरो या संगीत तज्ज्ञाने या पर्शियन वाद्याची व भारतीय वीणा या वाद्याची सांगड घालून सतार निर्माण केल्याचे सांगितले जाते.

सतारीची रचना :

ज्याला तालाचे ज्ञान नाही त्याला कलावंत म्हणणे उपहासाचे ठरेल. त्यामुळेच अथक परिश्रमाने ताल विद्याग्रहण करणे आवश्यक आहे. संगीतामध्ये विभिन्न तालाच्या व लयीच्या माध्यमातून रसांची निर्मिती होते. जेव्हा माता आपल्या बाळाला अंगाई गाऊन थोपटते तेव्हा ते बाळ लवकर निद्रादेवीच्या आधीन होते. सैनिकांमध्ये स्फुरण व जोश निर्माण होण्यासाठी विविध वाद्यांचे वादन केले जाते. कुस्तीच्या फडातील पहिलवानामध्ये हलगीचा नाद जोश निर्माण करतो. लोकनृत्यामध्ये नर्तक, नर्तकीचे नृत्य परमोच्च गतीकडे वाटचाल करते तेव्हा पूर्ण वातावरण नृत्यमय होते. नर्तक, दर्शक, तालवाद्य वादक यांच्यामध्ये एक प्रकारचे तादात्म्य निर्माण होऊन सर्व जण मंत्रमुग्ध होतात. ही भावविभोर अवस्था निर्माण करण्याची शक्ती तालामध्ये आहे. त्यामुळे तालविहीन संगीताची कल्पना आपण करू शकत नाही.

संगीतात तालामुळे आवर्तने निर्माण होतात, त्यामुळे एक प्रकारची शिस्त त्यामध्ये येते. गायन, वादन, नृत्याच्या आविष्कारामध्ये वैविध्यपूर्ण व चमत्कृतीपूर्ण रितीने समेवर येणे, अतीत, अनागतसारख्या नजाकती करणे केवळ तालामुळेच घडते.

'श्रुतीर्माता लयः पिता' या उक्तीनुसार श्रुती माता तर लय ही पिता आहे. या मातापित्याचा आश्रय घेऊन गायन, वादन, नृत्यातील कलावंत आपला सांगीतिक विचार प्रकट करतो. आपल्या विविध कल्पना लय व तालाच्या विभिन्न प्रयोगातून तो व्यक्त करतो. ही अभिव्यक्ती करत असताना तालाच्या आधीन राहून वेगवेगळ्या लय लयकारीचा प्रयोग, सवाल-जवाब इत्यादी प्रकार तालामुळेच शक्य आहेत.

प्रामुख्याने ताल ही अशी रचना आहे की, ज्याच्या आधारावर संगीतामध्ये वेळेचे मापन केले जाते. तालाची लांबी आवश्यकतेनुसार कमी जास्त करता येते. एकंदर तालामुळे अतिशय सुंदर, कलात्मक व लयात्मक रचनेचा आनंद आपल्याला घेता येतो.

उपक्रम : आपल्या सभोवतालच्या परिसरामध्ये नैसर्गिक लय तालाची उदाहरणे शोधा.

२. पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या व स्पष्टीकरण

२.१ कायदा :

कायदा म्हणजे नियम किंवा शिस्त होय. तबलावादनात नियमाला महत्त्व आहे. तालसिद्धांतानुसार सम, काल, विभाग दाखवत जी विस्तारक्षम बोलांची रचना वाजवली जाते अशा रचनेला 'कायदा' असे म्हणतात किंवा स्वराने सुरू होऊन स्वरानेच संपणारी खाली, भरी व खंडयुक्त विस्तारक्षम रचना म्हणजे कायदा होय.

उदा –

धा	धा	ती	ट	|	धा	धा	तीं	ना
×				|	२			
ता	ता	ती	ट	|	धा	धा	धीं	ना
०				|	३			

२.२ रेला

काही बोलांचा एक समूह जो द्रुत लयीत वाजवताना एक धारेसारखा प्रवाहित वाटतो त्यास 'रेला' म्हणतात किंवा स्वराने सुरू होऊन व्यंजनाने संपणारी विस्तारक्षम बोलरचना म्हणजेच रेला होय.

उदा –

धाऽतीर	कीटतक	तकतीर	कीटतक	|
×				
धाऽतीर	कीटतक	तींऽनाऽ	कीटतक	|
२				
ताऽतीर	कीटतक	तकतीर	कीटतक	|
०				
धाऽतीर	कीटतक	धींऽनाऽ	कीटतक	|
३				

२.३ तिहाई

एखादा बोलसमूह तीन वेळा दोन समान विरामांच्या अंतराने वाजवला असता अंतिम धा समेवर येतो त्यास 'तिहाई' असे म्हणतात.

उदा – त्रिताला मध्ये समेपासून समेपर्यंतची तिहाई

धाधा	तीट	धाधा	तींना	|	धाऽ	ऽऽ	धाधा	तीट	|		
×				|	२				|		
धाधा	तींना	धाऽ	ऽऽ	|	धाधा	तीट	धाधा	तींना	|	धा	
०				|	३				|	×	

२.३.१ दमदार तिहाई

दमदार तिहाईमधील दम याचा अर्थ थांबणे किंवा विश्रांती असा होय. जेव्हा एखाद्या तिहाईमध्ये बोल समूहाच्या शेवटच्या बोलानंतर म्हणजेच 'धा' या बोलावर थांबणे किंवा विश्रांती घेणे याला 'दमदार तिहाई' असे म्हणतात.

उदा – झपतालातील दमदार तिहाई

धाऽतीर	कीटतक	|	धाऽऽऽ	ऽऽऽऽ	धाऽतीर	|
×			२			
कीटतक	धाऽऽऽ	|	ऽऽऽऽ	धाऽतीर	कीटतक	| धीं
०			३			×

२.३.२ बेदम तिहाई

बेदम याचा अर्थ सलग किंवा न थांबता, एखाद्या तिहाईमध्ये बोलसमूहाच्या शेवटच्या बोलानंतर म्हणजेच 'धा' या बोलावर कमीतकमी विश्रांती असते अशा तिहाईस बेदम तिहाई म्हणतात.

बेदम तिहाईमधील विश्रांती काळ अर्धामात्रा, पाव मात्रा असतो.

उदा – त्रितालामधील बेदम तिहाई

धीना	धीधी	नाती	नाधी	|
×				
धीना	धाधी	नाधी	धीना	|
२				
तीना	धीधी	नाधा	धीना	|
०				
धीधी	नाती	नाधी	धीना	| धा
३				×

२.४ मुखडा

समेवर येण्यासाठी दुगुन अथवा चौगुन लयीत बांधलेल्या आकर्षक बोल रचनेस मुखडा असे म्हणतात. मुखडा तिहाईयुक्त अथवा बिनातिहाई असतो.

उदा. त्रितालातील कालापासून सुरू होणारा तिहाईयुक्त मुखडा

धा	धीं	धीं	धा	|	धा	धीं	धीं	धा	|
×					२				
तीरकीट	तकताऽ	तीरकीट	धाती	|	धाऽ	धाती	धाऽ	धाती	| धा
०					३				×

२.५ मोहरा

एखादा बोल समूह जो आकाराने एका आवर्तनापेक्षा कमी लांबीचा, मुखड्याच्या तुलनेत नाजूक बोलांचा समेवर येणारा बोलसमूह म्हणजे मोहरा होय. मोहरा तिहाईयुक्त किंवा बिनातिहाईचा असतो.

उदा. त्रितालातील कालापासून तिहाईरहित मोहरा

धा	धीं	धीं	धा	|	धा	धीं	धीं	धा	|
×					२				
कीटतक	तीरकीट	तकतक	तीरकीट	|	धाऽऽऽ	तीरकीट	तकतक	तीरकीट	| धा
०					३				×

२.६ टुकडा

समेला येऊन मिळण्यासाठी जो छोटा बोलसमूह वाजवला जातो त्याला 'टुकडा' असे म्हणतात. टुकड्याची लांबी जास्तीतजास्त २-३ आवर्तनांची असते.

उदा - त्रितालातील टुकडा

धागे	तीट	तागे	तीट	|	धागे	तीट	तागे	तीट	|
×					२				
कत	तीट	धागे	तीट	|	कत	धाऽ	नधा	ऽन	| धा
०					३				×

२.६ परन – परन हा पखवाजातील विशेष वादन प्रकार आहे. आज तबलावादनात देखील ऐकायला मिळतो. बोलांची पुनरावृत्ती व जोरकस बोलांची रचना परनमध्ये आढळते. धीट, तीट, गदीगन, कडधातीट, नागेतीट अशा बोलांचा उपयोग परनामध्ये केलेला असतो.

उदा- त्रितालमधील परन

धीटतीट	क्डधातीट	गदिगन	नागेतीट	|
×				
क्डधातीट	गदिगन	नागेतीट	गदिगन	|
२				
क्डधाऽन	धाऽधाऽ	धाऽऽऽ	क्डधाऽन	|
०				
धाऽधाऽ	धाऽऽऽ	क्डधाऽन	धाऽधाऽ	| धा
३				×

२.८ लग्गी –

केरवा, दादरा इत्यादी चंचल प्रकृतीच्या तालांचे ठेके वेगवेगळ्या स्वरूपात, दुगून लयीमध्ये कलात्मक पद्धतीने वाजवण्याच्या क्रियेला लग्गी असे म्हणतात.

लग्गीच्या प्रस्तुतीमध्ये विस्तार करताना खाली-भरीचा उपयोग अत्यंत सौंदर्यपूर्ण शैलीने केला जातो. सुगम, उपशास्त्रीय व सिनेसंगीतामध्ये याचा जास्त प्रमाणात उपयोग केला जातो.

उदा. लग्गी - केरवा ताल

१.	धा	ती	ना	ना	| ता	ती	ना	ना	|	धा
	×				०					×
२.	धाधी	नाधी	नाना	धीना	| धाधी	नाधी	नाना	तीना	|	धा
	×				०					×

लग्गी - दादरा ताल

१.	धाती	धाधा	तीना	| ताती	धाधा	धीना	| धा
	×			०			×
२.	धाऽ	धीना	तीट	| ताऽ	धीना	तीट	| धा
	×			०			×

स्वाध्याय

प्र. १ फरक स्पष्ट करा.

१. मोहरा – मुखडा

२. कायदा – रेला

३. दमदार तिहाई – बेदम तिहाई

प्र. २ सोदाहरण व्याख्या लिहा.

१. परन

२. टुकडा

३. लग्गी

४. मुखडा

प्र. ३ रिकाम्या जागा भरा.

१. स्वराने सुरू होऊन स्वरानेच संपणारी विस्तारक्षम रचना म्हणजे .... होय.

२. स्वराने सुरू होऊन व्यंजनाने संपणारी विस्तारक्षम रचना म्हणजे .... होय.

३. अर्धा मात्रा, पाव मात्रा विश्रांती काल .... तिहाईमध्ये असतो.

४. 'धा' बोलावर थांबणे किंवा विश्रांती घेणे याला .... तिहाई म्हणतात.

५. एखादा बोल समूह तीन वेळा दोन समान विरामांच्या अंतराने वाजवला असता अंतिम 'धा' समेवर येतो त्यास .... म्हणतात.

प्र. ४ चूक की बरोबर ते लिहा.

१. मुखड्याच्या तुलनेत नाजूक बोलांचा समेवर येणारा बोलसमूह म्हणजे मोहरा होय.

२. मुखडा तिहाईयुक्त अथवा बिनातिहाई असतो.

३. समेवर येऊन मिळवण्यासाठी जो छोटा बोलसमूह वाजवला जातो त्याला परन म्हणतात.

४. सुगम, उपशास्त्रीय, सिनेसंगीतामध्ये लग्गीचा उपयोग केला जातो.

५. कायदा हा पखवाजातील विशेष वादन प्रकार आहे.

३. तालवाद्यांचे विस्तृत अध्ययन (भारतीय व पाश्चात्य)

३.१ पखवाज :

भारतामधील अवनद्ध वाद्यांपैकी पखवाज हे एक प्राचीन अवनद्ध वाद्य आहे. पखवाजालाच मृदंग म्हणून ओळखले जाते. मृद म्हणजे माती. ज्याचे अंग मातीचे आहे त्याला मृदंग असे म्हणतात. भगवान शंकरानी त्रिपुरासूर या राक्षसाचा वध केला त्यावेळी ब्रह्मदेवाने मातीमध्ये त्रिपुरासूराचे रक्त मिसळून त्यापासून एक भांडे बनवले. त्याच भांड्यावर राक्षसाचे चामडे दोन्ही बाजूला बसवले यातूनच मृदंग अथवा पखवाजाची निर्मिती झाली अशी आख्यायिका आहे.



पखवाजाची रचना – पखवाज हे वाद्य शिसम, रक्तचंदन, खैर, चंदन, नीम व बाभूळ अशा लाकडांपासून तयार करतात. पखवाजाची लांबी २४ इंच असते. उजवीकडील भागाचे तोंड ७ इंच व्यासाचे असते तर डावीकडील भागाचे तोंड ९ इंच व्यासाचे असते. हे खोड आतून पोकळ असते याच्या दोन्ही मुखांवर पुड्या बसवलेल्या असतात उजव्या हाताची (दायाँ) पुडी ही तबल्याच्या पुडीप्रमाणे असते. ही पुडी बकऱ्याच्या चामड्यापासून तयार केली जाते. या पुडीवर शाई, लव, चाट व गजरा इत्यादी भाग असतात. डाव्या हाताची (बायाँ) पुडी ही शाई विरहीत असते या पुडीच्या मध्यभागी शाईऐवजी मळलेली कणीक व पाणी एकत्रित चिकटवतात. उजवीकडील स्वरात संवाद साधण्यासाठी कणकेचा गोळा कमी–अधिक करतात. या पुडीला धुमपुडी देखील म्हणतात. टिके, गजरा व पान इ धुमपुडीचे उपभाग असतात. या दोन्ही पुड्या खोडाच्या दोन्ही मुखांवर घट्ट बसण्यासाठी अखंड वादीने गुंफलेल्या असतात. ही वादी म्हशीच्या चामड्यापासून बनवलेली असते. पखवाज स्वरात लावण्यासाठी लाकडी आठ गठ्ठे वादीखाली लावतात. हातोडीने गजऱ्यावर आघात करून स्वर कमी जास्त करतात.

पखवाज खाली बसून अथवा उभे राहून वाजवतात. उभे राहून वाजवण्यासाठी लाकडी स्टँड वापरतात याला घोडी असेही म्हणतात. काही वेळा दोरीच्या किंवा पट्ट्यांच्या सहाय्याने बांधून गळ्यात अडकवून पखवाज वाजवला जातो. पंढरपूरच्या वारीमधील वारकरी पखवाज गळ्यात अडकवून वाजवत पालखीबरोबर चालतात.

पखवाजामध्ये देखील कुदऊसिंह, नाना पानसे, नाथद्वारा, मंगळवेढेकर इत्यादी घराणी आहेत. पखवाज हे वाद्य खुले व जोरकस वाजत असल्यामुळे थापेच्या सहाय्याने वाजवले जाते. स्वतंत्र वादनाबरोबर धृपद, धमार आणि भजन–कीर्तनासाठी हे वाद्य वाजवले जाते.

या वाद्यावर चौताल, तेवरा, सूलताल, गजझंपा, धमार इत्यादी ताल वाजवले जातात. धिटधिट, कडधातीट, कताकता, धुमकिट, गदिगन, तीटकत, दिंता असे बोल पखवाजावर वाजवले जातात. तसेच रेला, परन, तुकडे, चक्रदार हे वादन प्रकार वाजवतात.

उपक्रम : इंटरनेटच्या सहाय्याने पखवाज वादनामध्ये प्रसिद्ध असलेल्या वादकांची अधिक माहिती मिळवा, तसेच परिसरातील पखवाज वादकांच्या मुलाखती/भेटी घ्या.



३.२ ढोलक :

लोकसंगीतातील अत्यंत लोकप्रिय वाद्य म्हणून ढोलक हे वाद्य ओळखले जाते. ढोलक हे वाद्य ढोलाप्रमाणेच दिसते परंतु आकाराने लहान असते. आंबा, साग, शिसम, निम इत्यादी लाकडांच्या खोडापासून ढोलक तयार करतात. ढोलकाची लांबी १६ इंच असते. डावीकडील बाजू ८ इंच आणि उजवीकडील बाजू ६ इंच व्यासाची असते. याचा आतील भाग पोकळ असतो. याच्या मुखावर चामडे मढवलेले असते. उजव्या बाजूचे चामडे हे कडक असते तर डाव्या बाजूच्या चामड्याला आतून मेणी लावून मुलायम केले जाते. यामुळे यामधून निघणारे बोल हे उजव्या बाजूने तबल्याप्रमाणे कडक तर डाव्या बाजूने डग्याप्रमाणे मुलायम वाजतात. या वाद्याच्या पुड्या दोन्ही मुखांवर घट्ट बसाव्यात



यासाठी दोरीने गुफंलेल्या असतात. दोरीमध्ये लोखंडी कड्या (छल्ले) बसवलेल्या असतात. या कड्या मागेपुढे सरकवून हे वाद्य स्वरात लावले जाते. सध्या ढोलकवरील पुड्या नटबोल्टच्या साहाय्याने बसवल्या जातात. पान्याच्या मदतीने नट कमी अधिक आवळून ढोलक स्वरात लावतात. उजवीकडील बाजू उजव्या हाताच्या बोटांनी आणि डावीकडील बाजू डाव्या हाताच्या बोटांनी व मनगटाने वाजवले जाते. काही वेळा उजव्या हाताच्या अंगठ्यामध्ये कडी घालून, ही कडी पुडीच्या कडेला आघात करून वाजवतात. पखवाजाच्या तुलनेत हे वाद्य वजनाने हलके असते. त्यामुळे ढोलक गळ्यात अडकवून अथवा मांडीवर ठेवून वाजवला जातो.

दादरा, केरवा, दीपचंदी, चाचर इत्यादी ताल या वाद्यावर वाजवले जातात. धिक धा धा तिक धा धा, धेत्ता केत्ता इत्यादी बोल या वाद्यावर वाजवतात. लोकसंगीत, कव्वाली, चित्रपट संगीत व मंगलकार्यात हे वाद्य वाजवतात. राजस्थानी लोकसंगीतात याचा विशेष उपयोग केला जातो. मंगलकार्यात काही वेळा स्त्रियादेखील ढोलक वाजवताना दिसून येतात.

उपक्रम : इंटरनेटच्या सहाय्याने ढोलक वादकांमध्ये प्रसिद्‌ध असलेल्या वादकांची माहिती मिळवा, तसेच परिसरातील ढोलक वादकांच्या मुलाखती/भेटी घ्या.



३.३ ढोलकी :

ढोलकी हा शब्द उच्चारताच महाराष्ट्रातील लावणी हा नृत्यप्रकार डोळ्यांसमोर उभा राहतो. ढोलकीचा तोडा वाजताच मन शृंगाररसाने भरून जाते. शिसम, साग, बाभूळ इत्यादी झाडांच्या खोडापासून ढोलकी तयार केली जाते. खोड आतून पोकळ असते. याचा आकार उजवीकडे निमुळता



होत गेलेला असतो. त्यामुळे या वाद्याचे उजवीकडील मुख (दायाँ) ४' ते ६' रुंदीचे असते तर डावीकडील मुख (बायाँ) ८" ते १०" रुंदीचे असते. याच्या उजव्या मुखावर चामड्याची पुडी बसवलेली असते. या पुडीला तबल्याप्रमाणे चाट नसते. या पुडीवर पातळ शाईचा थर लवलेला असतो. शाईचा थर जितका पातळ तितकी पुडी तार सप्तकात वाजते. डाव्या बाजूकडील पुडीवर शाई नसते. तिच्या आतील बाजूस मेणी बसवलेली असते. या पुडीला धुमपान असेही म्हणतात.

या दोन्ही पुड्या खोडाच्या मुखावर घट्ट बसाव्यात यासाठी सुताच्या दोरीने घट्ट आवळल्या जातात. ढोलकी स्वरात लावण्यासाठी खिट्ट्यांनी पीळ दिला जातो. सध्या नटबोल्टच्या साहाय्याने दोन्ही पुड्या बसवल्या जातात. ढोलकी ही तार सप्तकातील स्वरांत लावली जाते.

ढोलकीची उजवीकडील बाजू हाताच्या बोटांनी, क्वचित थापेने आणि डावीकडील बाजू बोटांनी व तळव्याने वाजवतात.

दादरा व केरव्याच्या लग्ग्या आणि लोकनृत्याचे तोडे ढोलकीवर वाजवले जातात. ता ता ता, ना ना ना, धाऽ धाती ताऽधाती, तीरकीटतक तक्डाँ इत्यादी बोल ढोलकीवर वाजवतात. लावणी बरोबर लोकगीत, लोकनृत्य, पोवाडा, भारूड आणि चित्रपट गीतासाठी या वाद्याचा उपयोग केला जातो.

उपक्रम : इंटरनेटच्या सहाय्याने ढोलकी वादनामध्ये प्रसिद्‌ध असलेल्या वादकांची अधिक माहिती मिळवा, तसेच परिसरातील ढोलकी वादकांच्या मुलाखती/भेटी घ्या.



३.४ : ड्रमसेट

भारतीय संगीत हे नेहमी स्वरप्रधान व लय प्रधान भागात विभागलेले आहे. पाश्चात्य संगीत हे जास्तीत जास्त लयप्रधान आहे. पाश्चात्य संगीत कधीही विलंबित लयीमध्ये सादर केले जात नाही. पाश्चात्य संगीतामधील रचना या कायम मध्य अथवा द्रुत लयीमध्ये वाजवल्या जातात. पाश्चात्य संगीतामधील कोणत्याही तालवाद्याला शाई लावलेली नसल्यामुळे त्याला आस (नाद) राहत नाही. त्याचप्रमाणे तालाला भाषा नसल्यामुळे भाषाशैलीचा विकास होत नाही. या कारणांमुळे पाश्चात्य तालवाद्याला एक मर्यादा येते. या तालवाद्यामध्ये ड्रमसेट हे एक अत्यंत महत्त्वाचे वाद्य म्हणून ओळखले जाते. आजकाल भारतात देखील या वाद्याची लोकप्रियता वाढलेली दिसून येते. ड्रमसेटमध्ये ड्रम हे स्टँडवर ठेवूनच वाजवतात. वादकासाठी बसायला गोलकार सीट असलेली खुर्ची असते. ड्रमसेट हे लाकडी अथवा फायबर स्टीकच्या साहाय्याने वाजवतात.



बासड्रम – या सेट मध्ये सर्वात खालच्या बाजूस गोलाकार आकाराचा बास ड्रम (Bass Drum) असतो. हा पायाने रबरी अथवा स्पंजच्या स्टीकने वाजवतात. ही स्टीक पँडलला जोडलेली असते. साधारण बासड्रम (Bass Drum) या नावाप्रमाणे खालच्या स्वरामध्ये, बीटस वाजवल्यानंतर ऐकू येतात. बास ड्रमचे मुख सुमारे ३० ते ३२ इंच इतके असते.

स्नेअर ड्रम – स्नेअर ड्रमला साईड ड्रम असेही म्हणतात. हे ड्रम लाकडी असतात. दोन्ही बाजूला कातडे लावलेले असते. वरच्या बाजूला एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत दोरी अथवा तार ताणून बसवलेली असते. कातड्यावर आघात केल्यास तारेमुळे ध्वनी नियंत्रित होऊन टरटर असा नाद निर्माण होतो.

Rock Tom – हे दोन ड्रम लाकडी अथवा धातूचे असतात. ते एका बाजूने मुखावर चामड्याने ताणून बसवलेले असते. साधारण १२ × १०” आणि १३ × १२” या आकारात दोन rock tom असतात.

याशिवाय Hi Hat, Ride cymbol, crash cymbol देखील असतात. यातील काही डाव्या पायाने पॅडलच्या साहाय्याने वाजवतात तसेच उजव्या हाताच्या stick ने देखील वाजवतात. सध्या कार्यक्रमात Electronic Drum देखील वाजवतात.

उपक्रम : इंटरनेटच्या सहाय्याने ड्रमवादकांमध्ये प्रसिद्ध असलेल्या वादकांची अधिक माहिती मिळवा, तसेच परिसरातील ड्रमवादकांच्या मुलाखती/भेटी घ्या.



३.५ : रिदम मशीन

रिदम मशीन – रिदम याचा अर्थ ताल अथवा लय होय. असे ताल अथवा लय दर्शवणारे हे रिदम मशीन पूर्ण पणे Electronics आहे. त्यामध्ये टाळ, खंजिरी, तबला, पखवाज, ढोलक, ढोलकी, डफ, कोंगो, ड्रमसेट अशा अनेक वाद्यांचा आवाज तसेच साईड रिदमपैकी कबास, अंडाकृती शेकर, घुंगरू, चेंडा इत्यादी वाद्यांचा आवाज या मशीनद्वारे निर्माण करता येतो. साधारण १९८० च्या सुमारास हे रिदम मशीन अस्तित्वात आले. TR808 व TR909 या मॉडेलचे



रिदम मशीन अनेक हिट गाण्यात वापरले आहे. परंतु आता यामधील नावीन्य लक्षात घेऊन (Programme तयार करून) रिदम मशीन हाताळणे सुलभ झाले आहे. रिदम मशीन हाताळण्यासाठी तालाचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक आहे. तालवाद्य शिकलेली व्यक्तीच हे रिदम मशीन हाताळू शकते. या रिदम मशीनचा चांगल्या प्रमाणात परिणाम मिळण्यासाठी चांगल्या साऊंड सिस्टिमची आवश्यकता असते. या सिस्टिममध्ये Mixer, Amplifyer, Sound Box या सर्व गोष्टी चांगल्या दर्जाच्या असाव्या लागतात. Roland D - 70, (Boss) 200m, Alesxis, Ableton Live Softwere यासारख्या नामवंत कंपन्याची रिदम मशीन्स उत्तम दर्जाची आहेत. हे रिदममशीन पाहिजे त्या स्वरात, वेगवेगळ्या वाद्यांच्या आवाजात, वेगवेगळ्या लयीमध्ये वाजवता येते.

एखाद्या कार्यक्रमात रिदम प्रकार अगोदर माहीत असेल तर त्याचा Programme तयार करून Sequence नुसार तो स्टेजवर केवळ Operate करण्याचे काम करावे लागते. हे रिदम मशीन पूर्णपणे electronic असल्यामुळे त्यामधून कोणता आवाज येतो, हे पाहण्यासाठी याला Sound box जोडावा लागतो. त्यामुळे आपण दाबलेल्या बटणानुसार रिदम वाजतो की नाही हे नक्की कळते. रिदम मशीनवर अनेक प्रकारचे रिदम विविध वाद्यांनुसार वाजतात. त्यातील सर्व बटणांवर आधारीत Programme तयार होतो. त्यातील योग्य बटणांचा वापर माहीत असणे आवश्यक आहे.

स्वाध्याय

प्र.१ एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. थापेच्या साहाय्याने कोणते वाद्य वाजवले जाते ?

२. पखवाजावर वाजवल्या जाणाऱ्या दोन तालांची नावे लिहा.

३. ढोलकीचा उपयोग कोणत्या नृत्यासाठी केला जातो ?

४. कव्वालीच्या साथीसाठी कोणते वाद्य वाजवतात ?

५. प्रसिद्ध ढोलकीवादकांची नावे लिहा.

प्र.२ रिकाम्या जागा भरा.

१. धृपदा-धमार गायनाच्या साथीला ....हे वाद्य वाजवले जाते.

२. मंगलकार्य प्रसंगी .... हे वाद्य स्त्रियादेखील वाजवतात.

३. .... या वाद्याला कणीक लावली जाते.

४. परन हा वादनप्रकार .... या वाद्यावर वाजवला जातो.

५. ड्रमसेट .... स्टिकच्या साहाय्याने वाजवतात.

६. स्नेअर ड्रमला .... असेही म्हणतात.

७. रिदम मशीन हे पूर्णपणे .... आहे.

८. रिदम मशीन साधारण .... च्या सुमारास अस्तित्वात आले.

९. पाश्चात्य संगीत कधीही ....लयीमध्ये गायले जात नाही.

प्र.३ खालील वाद्यांची थोडक्यात माहिती लिहा.

१. पखवाज

२. ढोलक

३. ढोलकी

४. ड्रमसेट

५. रिदम मशीन

प्र.४ चूक की बरोबर ते लिहा.

१. चित्रपट संगीतासाठी ढोलक हे वाद्य वाजवले जाते.

२. ढोलकीला चाट नसते.

३. तिटकत गदिगन हा बोल ढोलकीवर वाजवला जातो.

४. पखवाजावर 'परन' वाजवतात.

५. भवानीशंकर हे कलाकार पखवाज वाद्यासाठी प्रसिद्ध आहेत.

४. स्वतंत्र वादन

संगीतामधील कोणत्याही प्रकारच्या सादरीकरणासाठी लय, ताल वाद्याची आवश्यकता असते. यामध्ये तबला, पखवाज या वाद्यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. गायन, वादन, नृत्य या कलांमध्ये जसजसा विकास होत गेला तसे वाद्यांमध्ये बदल होत गेले. धृपद, धमार गायकीचा प्रसार कमी होऊन ख्याल गायकी प्रचलित होऊ लागली, तसा तबला या वाद्याचा विकास होऊ लागला. पूर्वी कथ्थक नृत्याच्या साथीला पखवाज वाद्य होते, परंतु पखवाज वाद्याच्या रचनेमुळे लयीच्या वेगाला मर्यादा येत होती. त्यामुळे तबला वाद्य साथीला आले. यामध्ये अनेक तबला-पखवाज वादक उच्च प्रकाराची संगत करू लागले. त्यावर विचारविनिमय होऊ लागला, त्यातूनच स्वतंत्रवादनाचा विचार केला गेला. प्रतिभावान तबला पखवाज वादकांनी स्वतंत्रवादनाचे कार्यक्रम सुरू केले व त्याला लोकमान्यता मिळाली.

लयीच्या चढत्या क्रमानेच सादरीकरण होत असते. लयीच्या चढत्या क्रमाचा नियम हा संगीतातील कोणत्याही प्रकाराला लागू होतो स्वतंत्र तबलावादन देखील लयीच्या क्रमानुसार होत असते.

तबल्याची दिल्ली, अजराडा, लखनौ, फरूखाबाद, बनारस, पंजाब इत्यादी सहा घराणी आहेत. त्या प्रत्येक घराण्याची आपली स्वतः ची वादन शैली आहे. त्याप्रमाणे स्वतंत्रवादनामध्ये वादन प्रकारांची क्रमबद्धता दिसून येते. ज्याप्रमाणे बनारस घराण्याचे कलाकार स्वतंत्र वादनाची सुरुवात उठानने करतात, तर इतर घराण्याचे लोक 'पेशकार' ने सुरुवात करतात.

पूर्वीच्या काळी त्रितालमध्येच स्वतंत्र वादन करणे कलाकार पसंत करित. त्रितालाची समान विभाग रचना आणि खालीभरीचा संतुलित प्रयोग यामुळे कलाकार स्वतंत्र वादनासाठी त्रितालाची निवड करीत होते. रियाजामुळे कायदे, रेले या वादन प्रकारावर प्रभुत्व आले. त्यामुळे लयकारीचा विचार होऊ लागला त्यातूनच तिस्त्र, मिश्र, खंड जातीमध्ये तबलावादनाचा अभ्यास वाढत गेला.

स्वतंत्रवादनामध्ये लयीचा आधार म्हणून लहरा अथवा नगमा वाजवला जातो. हा नगमा लयीचे प्रमाण मानून स्वतंत्र वादन केले जाते. स्वतंत्र वादनामध्ये लहरा साथीदाराची भूमिका महत्त्वाची आहे. लहरा हा प्रामुख्याने सारंगी अथवा हार्मोनियमावर वाजवला जातो, क्वचित व्हायोलिनवरदेखील वाजवतात. स्वतंत्र तबलावादन हे लहऱ्याशिवाय अपूर्ण आहे स्वतंत्र वादनाचे प्रस्तुतीकरण पुढीलप्रमाणे असते.

१) पेशकार विलंबित अथवा मध्यलयीमध्ये स्वरमय व मुलायम बोलांचा पेशकार वाजवतात. ख्याल गायनात आलापाद्वारे जो विचार मांडला जातो तोच विचार स्वतंत्र वादनात पेशकाराद्वारे मांडला जातो.

२) कायदा कायदा हा एकपट वाजवून नंतर दुगुनमध्ये पलट्यांद्वारे कायद्याचा विस्तार केला जातो. कायद्याचे मुख, दोहरा, आधा दोहरा, विश्राम याप्रमाणे विस्तार वाजवून शेवट तिहाईने करतात. विविध बोलांचे व जातींचे कायदे वाजवले जातात.

३) रेला रेला हा अतिशय तयारीने वाजणारा प्रकार आहे. याचा विस्तार कायद्याप्रमाणे परंतु कमी प्रमाणात केला जातो. रेल्याचा शेवट तिहाईने करतात. रेल्यानंतर मध्य अथवा द्रुत लयीमध्ये गत, टुकडा, मोहरा, मुखडा, चक्रदार असा क्रम ठरलेला असतो.

सध्या स्वतंत्र तबलावादनाची लोकप्रियता वाढली आहे. वादन प्रभावी होण्यासाठी योग्य गुरूच्या सान्निध्यात दीर्घकाल रियाज करणे महत्त्वाचे आहे. तबला डग्ग्यातील वादन संतुलन (balance) हे रियाजामधूनच करता येते. वादनामध्ये भाषा सौंदर्य, वादन सौंदर्य, गणिती सौंदर्य हे बोलांच्या रचनेद्वारे मांडता येते. त्याचबरोबर पढंत हा एक महत्त्वाचा घटक आहे. तबलावादनातील बंदिशीचा भाव रसिकांपर्यत पढंतद्वारे पोहोचवता येतो.

माझा अभ्यास

प्र.१ थोडक्यात उत्तरे लिहा.

१. स्वतंत्र तबला वादनात साथीसाठी कोणती वाद्ये घेतात?

२. स्वतंत्र वादनात कोणती गोष्ट प्रमाण मानतात?

प्र.२ स्वतंत्र वादन या विषयी आपले विचार लिहा.

५. लय आणि लयीचे प्रकार

संगीतात तालाला महत्त्वाचे स्थान आहे. त्याचप्रमाणे तालशास्त्रात लयीलासुद्धा अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. सृष्टीची निर्मिती पाच तत्त्वांतून झाली. या पाच तत्त्वांत लय सामावलेली आहे. पृथ्वीचे परिभ्रमण, भरती-ओहोटी, नियमबद्ध ऋतुचक्र, दिवस-रात्र, पावसाची टपटप, मेघांचा गडगडाट, विजांचा कडकडाट या सर्वांमध्ये एक विशिष्ट प्रकारची लय सामावलेली आहे. एवढेच नाही तर श्वासाची स्पंदने, नाडीचे ठोके, हृदयाचे ठोके, यामध्येसुद्धा एक विशिष्ट प्रकारची लय आहे. या लयींमुळे स्वरांना, तालाला सुंदर आकृती व रूप येते. लयीच्या काही व्याख्या खालीलप्रमाणे आहेत.

- दोन मात्रांमधील समान अंतरास लय असे म्हणतात.
- वेळेच्या समान गतीला लय असे म्हणतात.
- ज्या गतीमध्ये मात्रा चालतात त्या गतीस लय म्हणतात.

लयीचे प्रकार : लयीचे मुख्य तीन प्रकार आहे.

(१) विलंबित लय (२) मध्य लय (३) द्रुत लय

५.१ विलंबित लय

ज्या मात्रेची गती अत्यंत सावकाश असते त्या गतीला 'विलंबित लय' असे म्हणतात. साधारणपणे गायनातील बडा ख्याल, तंतुवाद्यामधील मसीतखानी गत विलंबित लयीत सादर करतात. तबला वादनातील पेशकार विलंबित लयीत वाजवतात. विलंबित लयीमध्ये साधारण एका मात्रेचे चार भाग पडतात.

उदा.

धाऽऽऽ	धींऽऽऽ	धींऽऽऽ	धाऽऽऽ |	
×				
धाऽऽऽ	धींऽऽऽ	धींऽऽऽ	धाऽऽऽ |	
२				
धाऽऽऽ	तींऽऽऽ	तींऽऽऽ	ताऽऽऽ |	
०				
ताऽऽऽ	धींऽऽऽ	धींऽऽऽ	धाऽऽऽ |	धा
३				×

५.२ मध्य लय

ज्या मात्रांची गती विलंबित लयीपेक्षा जास्त व द्रुत लयीपेक्षा कमी असते त्याला मध्य लय असे म्हणतात. साधारण मध्य लय ही विलंबित लयीच्या दुप्पट असते व द्रुत लयीच्या निमपट असते. गायनामधील छोटा ख्याल, तंतुवाद्यामधील रजाखानी गत मध्यलयीत सादर करतात. तबला वादनातील कायदा, रेला मध्य लयीत वाजवतात. साधारण मध्य लयीत एका मात्रेचे दोन भाग पडतात.

उदा.

धाऽ	धींऽ	धींऽ	धाऽ |	धाऽ	धींऽ	धींऽ	धाऽ |	
×				२				
धाऽ	तींऽ	तींऽ	ताऽ |	ताऽ	धींऽ	धींऽ	धाऽ |	धा
०				३				×

५.३ द्रुत लय

साधारणपणे मध्यलयीपेक्षाही जलद गतीने चालणाऱ्या लयीस द्रुत लय म्हणतात. द्रुत लय ही मध्य लयीच्या दुप्पट गतीमध्ये व विलंबित लयीच्या चौपट गतीमध्ये असते. झाला, तराणा यांच्यासाठी द्रुत लयीचा प्रामुख्याने उपयोग होतो. तसेच तबला वादनातील गत, टुकडे, चक्रधार या लयीत वाजवले जातात. द्रुत लयीमध्ये एका मात्रेचा एकच भाग असतो.

उदा.

धा	धीं	धीं	धा |	धा	धीं	धीं	धा |	
×				२				
धा	तीं	तीं	ता |	ता	धीं	धीं	धा |	धा
०				३				×

माझा अभ्यास

प्र.१ रिकाम्या जागा भरा.

१) साधारणपणे मध्यलयीच्या दुप्पट असणाऱ्या गतीला .... लय म्हणतात.

२) दोन मात्रांमधील समान अंतरास .... असे म्हणतात.

३) ज्या लयीची गती विलंबित लयीपेक्षा अधिक व द्रुत लयीपेक्षा कमी असते त्या लयीला .... लय म्हणतात.

४) ज्या लयीमध्ये एका मात्रेचे चार भाग पडतात त्या लयीला .... लय म्हणतात.

५) एका मात्रेचे दोन भाग पडतात त्या लयीला .... लय म्हणतात.

प्र. २ एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) लयीचे तीन प्रकार कोणते ?

२) लय कशाला म्हणतात ?

३) तराणा कोणत्या लयीत गायला जातो ?

४) बडा ख्याल कोणत्या लयीत गायला जातो ?

प्र. ३ टीपा लिहा

१) विलंबित लय

२) मध्य लय

३) द्रुत लय

६. ताल परिचय व ताल लिपीबद्ध करणे. (एकपट व दुप्पट)

६.१ ताल–दादरा

मात्रा–६

विभाग–२ (३–३ मात्रांचे)

टाळी – १ (१ ल्या मात्रेवर)

खाली – १ (४ थ्या मात्रेवर)

मात्रा	१	२	३ |	४	५	६ |
एकपट	धा	धी	ना |	धा	ती	ना |
चिन्ह	×		|	०		|

	१	२	३ |	४	५	६ |	
दुप्पट	धाधी	नाधा	तीना |	धाधी	नाधा	तीना |	धा
	×		|	०		|	×

६.२ ताल–केहरवा (केरवा)

मात्रा–८

विभाग–२ (४–४ मात्रांचे)

टाळी – १ (१ ल्या मात्रेवर)

खाली – १ (५ व्या मात्रेवर)

मात्रा	१	२	३	४ |	५	६	७	८ |
एकपट	धा	गे	न	ती |	न	क	धी	न |
	×			|	०			|

	१	२	३	४ |	५	६	७	८ |	
दुप्पट	धागे	नती	नक	धीन |	धागे	नती	नक	धीन |	धा
	×			|	०			|	×

६.३ ताल–रूपक

मात्रा–७

विभाग–३ (३–२–२ मात्रांचे)

टाळी – २ (४ व ६ मात्रेवर)

खाली – १ (१ ल्या मात्रेवर)

सम व खाली एकाच मात्रेवर आहे.

मात्रा	१	२	३	४	५	६	७
एकपट	ती	ती	ना	धी	ना	धी	ना
चिन्ह	× ०			१		२	

	१	२	३	४	५	६	७	
दुप्पट	तीती	नाधी	नाधी	नाती	तीना	धीना	धीना	ती
	× ०			१		२		× ०

६.४ ताल–झपताल

मात्रा–१०

विभाग–४ (२–३–२–३ मात्रांचे)

टाळी – ३ (१,३,८ या मात्रांवर)

खाली – १ (६ व्या मात्रेवर)

मात्रा	१	२	३	४	५	६	७	८	९	१०
एकपट	धी	ना	धी	धी	ना	ती	ना	धी	धी	ना
	×		२			०		३		

	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	
दुप्पट	धीना	धीधी	नाती	नाधी	धीना	धीना	धीधी	नाती	नाधी	धीना	धी
	×		२			०		३			×

६.५ ताल–त्रिताल

मात्रा–१६

विभाग–४ (४–४–४–४ मात्रांचे)

टाळी – ३ (१,५,१३ या मात्रांवर)

खाली – १ (९ व्या मात्रेवर)

मात्रा १६	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६
एकपट	धा	धीं	धीं	धा	धा	धीं	धीं	धा	धा	तीं	तीं	ता	ता	धीं	धीं	धी
	×				२				०				३			

	१	२	३	४	५	६	७	८	
दुप्पट	धाधीं	धींधा	धाधीं	धींधा	धातीं	तींता	ताधीं	धींधा	
	×				२				
	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	
	धाधीं	धींधा	धाधीं	धींधा	धातीं	तींता	ताधीं	धींधा	धा
	०				३				×

६.६ ताल–तेवरा

मात्रा–७

विभाग–३ (३–२–२ मात्रांचे)

टाळी – ३ (१,४,६ या मात्रांवर)

खाली – या तालांमध्ये खाली नाही.

मात्रा	१	२	३	४	५	६	७	
एकपट	धा	दिं	ता	तीट	कत	गदि	गन	
चिन्ह	×			२		३		
	१	२	३	४	५	६	७	
दुप्पट	धादिं	तातीट	कत गदि	गन धा	दिंता	तीट कत	गदि गन	धा
	×			२		३		×

६.७ ताल–एकताल

मात्रा–१२

विभाग–६ (२–२–२–२–२–२ मात्रांचे)

टाळी – ४ (१,५,९,११ या मात्रांवर)

खाली – २ (३ व ७ या मात्रांवर)

मात्रा	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२
एकपट	धीं	धीं	धागे	त्रक	तू	ना	क	ता	धागे	त्रक	धी	ना
	×		०		२		०		३		४	

	१	२	३	४	५	६	
दुप्पट	धींधी	धागे त्रक	तूना	कत्ता	धागे त्रक	धीना	
	×		०		२		
	७	८	९	१०	११	१२	
	धींधीं	धागे त्रक	तूना	कत्ता	धागे त्रक	धीना	धीं
	०		३		४		×

६.८ ताल–चौताल

मात्रा–१२

विभाग–६ (२–२–२–२–२–२ मात्रांचे)

टाळी – ४ (१,५,९,११ या मात्रांवर)

खाली – २ (३ व ७ या मात्रांवर)

मात्रा	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२
एकपट	धा	धा	दिं	ता	तीट	धा	दिं	ता	तीट	कत	गदि	नग
	×		०		२		०		३		४	

	१	२	३	४	५	६	
दुप्पट	धाधा	दिंता	तीटधा	दिंता	तीट कत	गदि गन	
	×		०		२		
	७	८	९	१०	११	१२	
	धाधा	दिंता	तीटधा	दिंता	तीट कत	गदि गन	धा
	०		३		४		×

प्र.१ थोडक्यात उत्तरे लिहा.

१. प्रत्येक विभागाचा शेवट 'ना' या बोलाने होतो अशा तालांची नावे लिहा.

२. मात्रा, टाळी, खाली, विभाग समान असलेल्या दोन तालांची नावे लिहा.

प्र.२ रिकाम्या जागा.

अ) .... या तालात पहिल्या मात्रेवर खाली आहे.

ब) तीन टाळी व एक खाली .... व .... या तालात दिसून येते.

क) .... या तालामध्ये खाली नाही.

ड) .... व .... या तालाचा शेवट तीटकत गदिगन या बोलाने होतो.

प्र.३ जोड्या लावा.

अ.क्र.	'अ'	'ब'
१	त्रिताल	६ मात्रा
२	एकताल	७ मात्रा
३	रूपक	१२ मात्रा
४	झपताल	१६ मात्रा
५	दादरा	१० मात्रा

प्र.४ खालील ताल दुप्पटमध्ये लिपीबद्ध करा.

अ) त्रिताल

ब) चौताल

क) एकताल

ड) झपताल

इ) तेवरा

उपक्रम : अभ्यासक्रमातील तालांवर आधारित सिनेगीतांची माहिती मिळवा.

७. तालवादकांची जीवनचरित्रे

७.१ उ. झाकीर हुसेन (पंजाब घराणा)

तबला वादक, संगीतकार आणि तालतज्ञ झाकीर हुसेन हे जागतिक पातळीवरचे प्रसिद्ध व्यक्तिमत्व, उस्ताद अल्लारखाँ यांचे सर्वात मोठे सुपुत्र. आपल्या कौशल्यपूर्ण वादनाने आणि बुद्धिमत्तेमुळे ताल जगताला पडलेले सोनेरी स्वप्न म्हणजे उस्ताद झाकीर हुसेन होय.



जन्म

उ. झाकीर हुसेन यांचा जन्म ९ मार्च १९५१ रोजी मुंबई येथे झाला. त्यांच्या वडीलांचे नाव अल्लार खाँ व आईचे नाव बावी बेगम आहे. ग्यानी बाबा नावाच्या सत्पुरूषाने बावी बेगम यांना मुलाचे नाव झाकीर हुसेन ठेव असे सांगितले, झाकीर याचा एक अर्थ असा की जिक्र करतो तो, म्हणजे जिक्र करणे हा सूफी परंपरेचा भाग आहे.

गुरू व शिक्षण

पंजाब घराण्याचा मोठा वारसा घेऊन जन्माला आलेल्या उ. झाकीर हुसेन यांची लहानपणापासूनच तबल्यावर बोटे फिरू लागली. त्यांचे तबला वादनाचे शिक्षण उ. अल्लारखाँ यांच्याकडे झाले. त्यांचे शालेय शिक्षण सेंट मॉयकेल हायस्कूल, माहीम येथे तर महाविद्यालयीन शिक्षण सेंट झेविअर्स कॉलेज, मुंबई येथे झाले. झाकीर हुसेन आपल्या तबला वादनाचे श्रेय तबलावादनातील त्रिमूर्तीला देतात. ही त्रिमूर्ती म्हणजे पं. सामताप्रसाद, पं किशन महाराज आणि त्यांचे वडील अल्लार खाँ.

परिश्रम

घरात परंपरागत तबलावादनाचे वातावरण होते. पहाटे तीन वाजता उठवून अल्लारखाँ (बाबा) बोल शिकवायचे, तालबद्ध शब्दोच्चार शिकवायचे. वडीलांच्या मार्गदर्शनाखाली झाकीर हुसेन यांनी अथक परिश्रम घेतले. वर्षानुवर्षे केलेला अखंड रियाज, अल्लारखाँ यांचे योग्य मार्गदर्शन यामुळे उ. झाकीर हुसेन एक महान तबलावादक म्हणून उदयास आले.

वादनशैली

उ. झाकीर हुसेन यांची वादनशैली पंजाब घराण्याची आहे. ते इतर सर्व घराण्यांचादेखील तबला तयारीने वाजवतात. वादनातील तयारी, वादन स्पष्टता, गोडवा, दायाँ-बायाँवरील अप्रतिम संतुलन, गणिती सौंदर्य, क्लिष्ट लयकारीवरील प्रभुत्व या साऱ्याच गोष्टी कल्पनातीत आहेत. स्वतंत्र वादनाबरोबरच गायन, वादन, नृत्याची साथसंगत म्हणजे रसिक प्रेक्षकांना मोठी मेजवानी असते. भारतीय संगीताबरोबरच पाश्चात्य संगीताचा त्यांचा मोठा अभ्यास आहे.

यशस्वीता

ईश्वर प्राप्त देणगी लाभलेल्या उ.झाकीर हुसेन यांनी वयाच्या सातव्या वर्षी पाहिला जाहीर कार्यक्रम केला. वयाच्या बाराव्या वर्षी तबलावादनासाठी जगभ्रमण सुरू केले. १९७० मध्ये त्यांनी अमेरिकेत एकाच वर्षात १५० यशस्वी मैफिली केल्या. भारतीय व पाश्चात्य कलावंतासोबत फ्युजन या प्रकारातून भारतीय संगीताचे महत्त्व सर्व जगामध्ये पोहोचवले.

देशविदेशातील विद्यापीठांमध्ये तबलावादनाचे अध्यापनाचे कार्य ते करीत आहेत. सॅनफ्रॅन्सिस्को आणि मुंबई येथील आपल्या अकादमीच्या माध्यामातून विद्यार्थ्यांना तबलावादनाचे अनमोल असे मार्गदर्शन करीत आहेत.

मानसन्मान/पुरस्कार

उ. झाकीर हुसेन यांना पद्मश्री, पद्मभूषण, संगीत नाटक अकादमी पुरस्कार, ग्रॅमी अॅवार्ड असे पुरस्कार मिळालेले आहेत. अमेरिकेची प्रतिष्ठित नॅशनल हेरीटेज फेलोशिप, 'The speaking hand zakir hussain

and art of the Indian drum' आणि 'Zakir and his friends 1998' या दोन dacumentry film त्यांच्या जीवनावर तयार करण्यात आल्या आहेत.

१९८३ साली प्रदर्शित 'Heart and dust' या चित्रपटापासून त्यांनी चित्रपटाला संगीत देण्यास प्रारंभ केला. 'साज', The majestik major' 'Mister and Mrs. Iyyer या चित्रपटांना उस्तादजींनी संगीत दिलेले आहे.

२०१८ साली 'माझं तालमय जीवन' झाकीर हुसेन हे त्यांच्या जीवनावर आधारित प्रणव सखदेव यांनी अनुवाद केलेले पुस्तक प्रकाशित झाले आहे.

७.२ प. भवानीशंकर

पखवाज हे प्राचीन वाद्य आहे. मृदंग हे पखवाजाचे मूळ स्वरूप आहे. पखवाज या वाद्याला अवनद्ध वाद्याचा राजा असे म्हटले जाते तसेच पखवाज हे तबलावाद्याचे आद्य स्वरूप मानले जाते. काळाच्या ओघात बाजूला पडत चाललेल्या या वाद्याला नवसंजीवनी देण्याचे कार्य पंडित भवानीशंकर करीत आहेत.



जन्म व बालपण

पंडित भवानीशंकर यांचा जन्म १२ सप्टेंबर १९५६ रोजी मुंबई येथे सांगीतिक वारसा लाभलेल्या कुटुंबात झाला. त्यांच्या वडीलांचे नाव पंडित बाबूलालजी कथ्थक असे होते, तर त्यांच्या आजोबांचे नाव पंडित मख्खनलालजी असे होते. वडील बाबूलालजी कथ्थक हे जयपूर घराण्याचे कलावंत होते, तर पंडित मख्खनलालजी हे थोर मृदंगाचार्य होते.

गुरु आणि शिक्षण

घरात सात पिढ्यांपासून संगीताचा वारसा असल्यामुळे पं. भवानीशंकर यांना संगीताचे ज्ञानामृत घरातूनच मिळाले. वयाच्या आठव्या वर्षापासून त्यांनी वडीलांकडून पखवाज व तबलावादनाचे शिक्षण घेण्यास प्रारंभ केला. वडीलांबरोबर त्यांचे आजोबा मृदंगाचार्य पं. मख्खनलालजी यांचेही त्यांना मार्गदर्शन लाभले. जयपूर व कुदऊसिंह घराण्याची तालीम त्यांना मिळाली.

वादनशैली

पखवाज वाद्याला लोकप्रियता मिळवण्यासाठी त्यांनी कठोर नियमांची चौकट बाजूला केली. बोलांचा वेग, बोलांची स्पष्टता व दायाँ-बायाँ यांच्या समन्वयातून त्यांनी स्वतंत्र अशी वादनशैली विकसित केली. मुख्य म्हणजे पखवाज हे गंभीर वाद्य असतानाही त्यांनी बासरी व संतूर अशा वाद्यांना साथसंगत करून अनोखा आविष्कार साधला आहे.

यशस्विता

पंडित भवानीशंकर यांनी पखवाज या वाद्याला जागतिक रंगमंचावर पोहोचवण्यासाठी मोलाचे कार्य केले. पारंपरीक धृपद गायनाच्या साथीबरोबरच स्वतंत्र वादनाच्या माध्यमातून पखवाज या वाद्याला त्यांनी जगभर किर्ती मिळवून दिली. त्यांना खरी प्रसिद्धी मिळाली ती 'झाकीर हुसेन ॲण्ड द रिद्म एक्सपिरियन्स' या कार्यक्रमातून! उस्ताद झाकीर हुसेन आणि पंडित भवानीशंकर यांनी एकत्र येऊन तबला व पखवाज वादनाच्या जुगलबंदीचे कार्यक्रम सादर केले. त्यांच्या या कार्यक्रमाला जगभरात अमाप लोकप्रियता मिळाली. त्यांनी काही चित्रपटांतील गीताच्या संगतीमुळे व प्रायोगिक फ्युजन कार्यक्रमांमुळे त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.

चित्रपट निर्माते व दिग्दर्शक व्ही. शांताराम यांनी पं. भवानीशंकर यांना प्रथमतः संधी दिली. त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. त्यांनी लक्ष्मीकांत प्यारेलाल, ए. आर. रेहमान इ. संगीतकारांसाठी पखवाज वादन केले, त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीमधील रंगमंचीय कार्यक्रमात प्रत्यक्ष वादन केले.

मानसन्मान/पुरस्कार

अथक परिश्रमाचे द्योतक म्हणून त्यांना अनेक मानसन्मान मिळाले. त्यांना तालश्री, तालविलास संगीत नाटक अकादमी पुरस्कार, पं. जसराज गौरव पुरस्कार,

महाराष्ट्र कला निकेतन पुरस्कार मिळाले. तसेच ग्रॅमी ॲवार्डसाठीदेखील त्यांचे नामांकन झाले आहे.

सध्या ते मुंबई येथे वास्तव्यास आहेत. ते विद्यार्थ्यांना विनाशुल्क शिक्षण देत आहेत. विद्यार्थ्यांनी या कलेत प्रावीण्य मिळवावे आणि ही परंपरा जिवंत ठेवावी हीच त्यांची इच्छा आहे. पखवाज वाद्याला जागतिक पातळीवर सन्मान मिळावा एवढेच त्यांचे ध्येय आहे. नरेश व उमाशंकर ही त्यांची दोन मुले आहेत. नरेश हे कथ्थक नर्तक आहेत तर उमाशंकर हे शास्त्रीय गायक व वेस्टर्न पियानोवादक आहेत.

७.३ पं. स्वपन चौधरी (लखनौ घराणा)

जगभरातील सर्वतोपरी आदरणीय असलेल्या तबला वादकांपैकी एक म्हणून संगीत जगतात पं. स्वपन चौधरी याचे नाव आदराने घेतले जाते.



जन्म

पं. स्वपन चौधरी यांचा जन्म १९४७ साली कलकत्ता येथे झाला.

गुरू आणि शिक्षण

वयाच्या पाचव्या वर्षापासून पं. संतोष कृष्ण विश्वास यांच्याकडे लखनौ घराण्याचे परंपरागत शिक्षण घेतले. कोलकता येथील जाधवपूर विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयाची पदवी घेतली. तसेच संगीत विषयात M.A. ही पदवी प्राप्त केली.

परिश्रम

घरातच वादनाची आवड असल्यामुळे वडीलांनी सपनदादा यांच्या रियाजाकडे लक्ष दिले. गुरूंच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या अखंड रियाजामुळे स्वपन चौधरी हे नाव परिचित होऊ लागले.

वादनशैली

पं. स्वपन चौधरी यांची लखनौ घराण्याची वादनशैली आहे. वादनातील स्पष्टता, अविश्वसनीय वेग, अप्रतिम विविधता, मोहकपणा, बुद्धीचातुर्य, तबलाडग्यातील संतुलन, तबल्याच्या चाटीतून निघणारी आस इत्यादी वैशिष्ट्ये त्यांच्या वादनामधून दिसून येतात.

यशस्वीता

उ. हबीबखान, अमीरखान, वसंतराय, उ. विलायत खाँ इ. वादक तसेच पं. भीमसेन जोशी, पं. जसराज, डॉ. बालमुरली कृष्णन इ. भारतीय गायक आणि एल शंकर, जॉन हँडी व आफ्रिकन ड्रमर मास्टर मालेंगा यांच्यासोबत साथसंगत केली आहे. तसेच टोकीयो, सॅन फ्रान्सिस्को, क्वालांलपूर, स्टटगार्ड, बार्लिन येथील आंतरराष्ट्रीय संगीत महोत्सवांत भाग घेतला आहे.

१ मे १९८१ पासून अलिअकबर कॉलेजमध्ये (अमेरिका – कॉलिफोर्निया) तालवाद्याचे संचालक म्हणून काम पाहत आहेत.

मानसन्मान/पुरस्कार

अमेरिकन ॲकॅडमी ऑफ आर्टिस्टचा पुरस्कार, Percussive Arts society Hall of Fame साठी नामांकन, आशा भोसले व अली अकबर खान यांच्यासोबत दोन ग्रॅमी नामांकनांचे विक्रम केले.

१६ मार्च १९९६ रोजी संगीत नाटक अकादमी पुरस्कार, २०१९ साली पद्मश्री पुरस्कार प्राप्त झाला.

सध्या ते अमेरिकेत वास्तव्यास आहेत. त्या ठिकाणी अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत आहेत यामध्ये प्रामुख्याने अभिनय पाध्ये, निलन चौधरी, सतीश तारे, श्रीपाद तोरवी, अरविंद साठे यांचा उल्लेख करावा लागेल.

उपक्रम : उस्ताद झाकीर हुसेन, पं. स्वपन चोधरी, पं. भवानीशंकर यांच्या Video clips पहा व त्यांच्या वादनशैलीचे निरीक्षण करा.

तालवाद्य प्रात्यक्षिक

१. खालील तालात लिपीबद्ध्ध करणे. (कायदा आणि टुकडा)

१.१ त्रिताल – कायदा

१	२	३	४	५	६	७	८	
धाती	टधा	तीट	धाधा	तीट	धागे	तिना	कीन	
×				२				
९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	
ताती	टता	तीट	ताता	तीट	धागे	धिना	गिन	धा
०				३				×

त्रिताल – टुकडा

१	२	३	४	
दिंऽ	दिंऽ	तीट	तीट	
×				
५	६	७	८	
कऽत्ऽ	तीरकीट	तकताऽ	तीरकीट	
२				
९	१०	११	१२	
धाऽऽऽ	तीरकीट	तकताऽ	तीरकीट	
०				
१३	१४	१५	१६	
धाऽऽऽ	तीरकीट	तकताऽ	तीरकीट	धा
३				×

१.२ झपताल – कायदा

१	२	३	४	५	
धागेतीट	धिनगिन	धागेतीट	धागेत्रक	तिनाकीन	
×		२			
६	७	८	९	१०	
ताकेतीट	तिनाकीन	धागेतीट	धागेत्रक	धिनागिन	धी
०		३			×

झपताल – टुकडा

१	२	३	४	५	
घेऽतीरकीटतक	ताऽतीरकीटतक	ताऽऽक्ड	धान् धान्	धाऽऽऽ	
×		२			
६	७	८	९	१०	
ताऽऽक्ड	धान् धान्	धाऽऽऽ	ताऽऽक्ड	धान् धान्	धी
०		३			×

माझा अभ्यास

प्र. १ लिपीबद्ध करा.

(१) त्रितालामध्ये एक कायदा व एक टुकडा

(२) झपतालामध्ये एक कायदा व एक टुकडा

२. सादरीकरण

२.१ त्रिताल

२.१.१ त्रिताल – कायदा

१	२	३	४	५	६	७	८	
धाति	धागे	नाधा	तीरकीट	धाती	धागे	तिना	कीन	
×				२				
९	**१०**	**११**	**१२**	**१३**	**१४**	**१५**	**१६**	
ताति	ताके	नाता	तीरकीट	धाती	धागे	धिना	गिन	धा
०				३				×

२.१.२ त्रिताल – मोहरा

१	२	३	४	५	६	७	८	
धाति	ऽधा	तीरकीट	धाती	धाऽतीर	कीटतक	ताऽतीर	कीटतक	
×				२				
९	**१०**	**११**	**१२**	**१३**	**१४**	**१५**	**१६**	
तीरकीट	तकताऽ	तीरकीट	धाती	धाऽ	धाती	धाऽ	धाती	धा
०				३				×

२.१.३ त्रिताल – टुकडा

१	२	३	४	५	६	७	८
धागे	तीट	तागे	तीट	धागे	दिंऽ	नागे	तीट
×				२			
९	**१०**	**११**	**१२**	**१३**	**१४**	**१५**	**१६**
कती	टता	गेन	धागे	तीट	कत	गदि	गन
०				३			

१	२	३	४	५	६	७	८	
धेत	धेत	तगे	ऽन्न	धाऽ	ऽऽ	धेत	धेत	
×				२				
९	**१०**	**११**	**१२**	**१३**	**१४**	**१५**	**१६**	
तगे	ऽन्न	धाऽ	ऽऽ	धेत	धेत	तगे	ऽन्न	धा
०				३				×

२.१.४ त्रिताल – चक्रदार

१	२	३	४	
दिंऽदिंऽ	तीटतीट	कऽत्ऽतीरकीट	तकताऽतीरकीट	
×				
५	६	७	८	
धाऽऽऽ	कऽत्ऽतीरकीट	तकताऽतीरकीट	धाऽऽऽ	
२				
९	१०	११	१२	
कऽत्ऽतीरकीट	तकताऽतीरकीट	धाऽऽऽ	दिंऽदिंऽ	
०				
१३	१४	१५	१६	
तीटतीट	कऽत्ऽतीरकीट	तकताऽतीरकीट	धाऽऽऽ	
३				
१	२	३	४	
कऽत्ऽतीरकीट	तकताऽतीरकीट	धाऽऽऽ	कऽत्ऽतीरकीट	
×				
५	६	७	८	
तकताऽतीरकीट	धाऽऽऽ	दिंऽदिंऽ	तीटतीट	
२				
९	१०	११	१२	
कऽत्ऽतीरकीट	तकताऽतीरकीट	धाऽऽऽ	कऽत्ऽतीरकीट	
०				
१३	१४	१५	१६	
तकताऽतीरकीट	धाऽऽऽ	कऽत्ऽतीरकीट	तकताऽतीरकीट	धा
३				×

२.१.५ लग्गी – केरवा ताल

१	२	३	४		५	६	७	८		
घेघे	तीट	घेघे	नाना	|	केके	तीट	केके	नाना	|	धा
×					०					×

लग्गी – दादरा ताल

१	२	३		४	५	६		
धाती	धाधा	तीरकीट	|	ताती	ताता	तिरकीट	|	धा
×				०				×

२.१.५ त्रिताल – परन

१	२	३	४	
धागेतीट	तागेतीट	धागेतीट	तागेतीट	|
×				
५	६	७	८	
क्डधातीट	धागेतीट	क्डधातीट	धागेतीट	|
२				
९	१०	११	१२	
गदिगन	नागेतीट	गदिगन	नागेतीट	|
०				
१३	१४	१५	१६	
कतीटता	गेनधागे	तीटकत	गदिगन	|
३				

१	२	३	४		
कतीटता	गेनधागे	तीटकत	गदिगन	|	
×					
५	६	७	८		
धाऽऽऽ	ऽऽऽऽ	कतीटता	गेनधागे	|	
२					
९	१०	११	१२		
तीटकत	गदिगन	धाऽऽऽ	ऽऽऽऽ	|	
०					
१३	१४	१५	१६		
कतीटता	गेनधागे	तीटकत	गदिगन	|	धा
३					×

२.२ इयत्ता अकरावीच्या सर्व तालांची माहिती सांगणे व वाजवणे.

२.३ इयत्ता अकरावीचे सर्व ताल हातावर टाळी, खाली दाखवून म्हणणे.

२.३.१ ताल – दादरा

मात्रा – ६

विभाग – २ (३–३ मात्रांचे)

टाळी – १ (पहिल्या मात्रेवर)

खाली – १ (चौथ्या मात्रेवर)

मात्रा –	१	२	३	४	५	६		
ठेका –	धा	धी	ना	धा	ती	ना		धा
चिन्ह –	×			०				×

उपयोग : हा ताल सुगम, उपशास्त्रीय, सिनेसंगीत व लोकसंगीताच्या साथीला वाजवतात.

२.३.२ ताल – रूपक

मात्रा – ७

विभाग – ३ (३–२–२ मात्रांचे)

टाळी – २ (४ व ६ व्या मात्रांवर)

खाली – १ (पहिल्या मात्रेवर)

सम व खाली एकाच मात्रेवर आहे.

मात्रा –	१	२	३	४	५	६	७	
ठेका –	ती	ती	ना	धी	ना	धी	ना	ती
चिन्ह –	× ०			१		२		× ०

उपयोग : हा ताल शास्त्रीय, सुगम, नाट्यसंगीताच्या साथीला वाजवतात.

२.३.३ ताल – केरवा (केहरवा)

मात्रा – ८

विभाग – २ (४–४ मात्रांचे)

टाळी – १ (पहिल्या मात्रेवर)

खाली – १(पाचव्या मात्रेवर)

मात्रा –	१	२	३	४	५	६	७	८	
ठेका –	धा	गे	न	ती	न	क	धी	न	धा
चिन्ह –	×				०				×

उपयोग : हा ताल सुगम, उपशास्त्रीय, सिनेसंगीत व लोकसंगीताच्या साथीला वाजवतात.

२.३.४ ताल – झपताल

मात्रा – १०

विभाग – ४ (२–३ – २–३ मात्रांचे)

टाळी – ३ (१, ३, ८ व्या मात्रांवर)

खाली – १ (सहाव्या मात्रेवर)

मात्रा –	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	
ठेका –	धी	ना	धी	धी	ना	ती	ना	धी	धी	ना	धी
चिन्ह –	×		२			०		३			×

उपयोग : या तालाचा उपयोग शास्त्रीय संगीत व नाट्यसंगीतासाठी केला जातो.

२.३.५ ताल – त्रिताल (तिनताल)

मात्रा – १६

विभाग – ४ (४–४ मात्रांचे)

टाळी – ३ (१, ५, १३ व्या मात्रांवर)

खाली – १ (नवव्या मात्रेवर)

मात्रा –	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	
ठेका –	धा	धीं	धीं	धा	धा	धीं	धीं	धा	धा	तीं	तीं	ता	ता	धीं	धीं	धा	धा
चिन्ह –	×				२				०				३				×

उपयोग : हा ताल सर्व संगीत प्रकाराच्या साथीसाठी वाजवतात.

२.३.६ ताल – तेवरा

मात्रा – ७

विभाग – ३ (३–२–२ मात्रांचे)

टाळी – ३ (१–४–६व्या मात्रेवर)

खाली – या तालामध्ये खाली नाही.

मात्रा –	१	२	३	४	५	६	७	
ठेका –	धा	दिं	ता	तीट	कत	गदी	गन	धा
चिन्ह –	×			२		३		×

उपयोग : तेवरा ताल पखवाजावर धृपद गायनाच्या साथीला वाजवतात.

२.३.७ ताल – चौताल

मात्रा – १२

विभाग – ६ (२-२-२-२-२-२ मात्रांचे)

टाळी– ४ (१, ५, ९,११ मात्रेवर)

खाली – २ (३ व ७ व्या मात्रेवर)

मात्रा –	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	
ठेका –	धा	धा	दिं	ता	कीट	धा	दिं	ता	तीट	कत	गदी	गन	धा
चिन्ह –	×		०		२		०		३		४		×

उपयोग : चौताल धृपद गायनाच्या साथीला पखवाजावर वाजवतात.

२.३.८ ताल – भजनी

मात्रा – ८

विभाग – २ (४-४ मात्रांचे)

टाळी– १ (पहिल्या मात्रेवर)

खाली – १ (पाचव्या मात्रेवर)

मात्रा –	१	२	३	४	५	६	७	८	
ठेका –	धींऽ	नाधीं	ऽधीं	नाऽ	धींऽ	नातीं	ऽतीं	नाऽ	धीं
चिन्ह –	×				०				×

उपयोग : हा ताल अभंग, भजन, किर्तन, नाट्यसंगीत, लोकसंगीताच्या साथीला वाजवतात.

माझा अभ्यास

प्र. १ त्रिताल, झपताल, चौताल, तेवरा इत्यादी तालांची शास्त्रीय माहिती द्या.

प्र. २ दादरा अथवा केरवा तालात लग्गी वाजवून दाखवा.

प्र. ३ चौताल, तेवरा, झपताल, त्रिताल इत्यादी ताल कोणत्या प्रकारच्या संगीतासाठी साथीला वाजवतात.

प्र. ४ दादरा, रूपक, केरवा, भजनी इत्यादी ताल कोणत्या प्रकारच्या संगीतासाठी साथीला वाजवतात.

प्र. ५ कायदा, मोहरा, टुकडा, चक्रदार, परन इत्यादी वादनप्रकार वाजवून दाखवा.

उपक्रम : गणपतीच्या आरतीला कोणता ताल वाजवला आहे, याची माहिती मिळवा.

३. स्वतंत्र तबलावादन लहरासाथीबरोबर सादर करणे. (वाजवणे)

३.१) त्रिताल

एक कायदा

१	२	३	४	५	६	७	८
धाती	टधा	तीट	धाधा	तीट	धागे	तिना	कीन
×				२			
९	१०	११	१२	१३	१४	१५	१६
ताती	टता	तीट	ताता	तीट	धागे	धिना	गिन
०				३			

प्रकार – १

धाती	टधा	तीट	धाधा	धाती	टधा	तीट	धाधा
×				२			
धाती	टधा	तीट	धाधा	तीट	धागे	तिना	किन
०				३			
ताती	टता	तीट	ताता	ताती	टता	तीट	ताता
×				२			
धाती	टधा	तीट	धाधा	तीट	धागे	धिना	गिन
०				३			

प्रकार – २

धाधा	धाती	टधा	तीट	धाधा	धाती	टधा	तीट
×				२			
धाती	टधा	तीट	धाधा	तीट	धागे	तिना	किन
०				३			
ताता	ताती	टता	तीट	ताता	ताती	टता	तीट
×				२			
धाती	टधा	तीट	धाधा	तीट	धागे	धिना	गिन
०				३			

प्रकार – ३

धाती	टधा	धाधा	तीट	धाती	टधा	धाधा	तीट
×				२			
धाती	टधा	तीट	धाधा	तीट	धागे	तिना	किन
०				३			
ताती	टता	ताता	तीट	ताती	टता	ताता	तीट
×				२			
धाती	टधा	तीट	धाधा	तीट	धागे	धिना	गिन
०				३			

प्रकार – ४

धाती	टधा	तीट	धाधा	तीट	तीट	धाधा	तीट
×				२			
धाती	टधा	तीट	धाधा	तीट	धागे	तिना	किन
०				३			
ताती	टता	तीट	ताता	तीट	तीट	ताता	तीट
×				२			
धाती	टधा	तीट	धाधा	तीट	धागे	धिना	गिन
०				३			

तिहाई

तीट	धागे	धिना	गिन	धाऽ	कत्	तीट	धागे	
×				२				
धिना	गिन	धाऽ	कत्	तीट	धागे	धिना	गिन	धा
०				३				×

मोहरा – १ त्रितालात कालापासून

१	२	३	४	५	६	७	८	
धा	धीं	धीं	धा	धा	धीं	धीं	धा	
×				२				
९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	
धाती	धाऽतीर	कीटतक	धाती	धाऽ	धाती	धाऽ	धाती	धा
०				३				×

मोहरा – २ त्रितालात समेपासून

१	२	३	४	५	६	७	८	
ताऽ	तूना	कीटतक	ताऽतीर	कीटतक	तीरकीट	तकताऽ	तीरकीट	
×				२				
९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	
धाऽऽऽ	तीरकीट	तकताऽ	तीरकीट	धाऽऽऽ	तीरकीट	तकताऽ	तीरकीट	धा
०				३				×

त्रिताल टुकडा – १

१	२	३	४	५	६	७	८	
धींना	कीटतक	ताऽतीर	कीटतक	तीरकीट	तकताऽ	तीरकीट	धाती	
×				२				
९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	
धाऽ	ऽऽ	ऽऽ	धाती	धाऽ	१ऽऽऽ	२ऽऽऽ	धाती	धा
०				३				×

त्रिताल टुकडा – २

१	२	३	४	
दिं	दिं	तीट	तीट	
×				
५	६	७	८	
कऽतऽ	तीरकीट	तकताऽ	तीरकीट	
२				
९	१०	११	१२	
धाऽऽऽ	तीरकीट	तकताऽ	तीरकीट	
०				
१३	१४	१५	१६	
धाऽऽऽ	तीरकीट	तकताऽ	तीरकीट	धा
३				×

त्रिताल चक्रदार

१	२	३	४
धागेतींना	कीटतकताऽतीर	कीटतकतीरकीट	तकताऽतीरकीट
×			
५	६	७	८
धाऽऽऽतीरकीट	तकताऽतीरकीट	धाऽऽऽतीरकीट	तकताऽतीरकीट
२			
९	१०	११	१२
धाऽकत	धाऽकत	धाऽऽऽ	धागेतींना
०			
१३	१४	१५	१६
कीटतकताऽतीर	कीटतकतीरकीट	तकताऽतीरकीट	धाऽऽऽ तीरकीट
३			

१	२	३	४	
तकताऽतीरकीट	धाऽऽऽतीरकीट	तकताऽतीरकीट	धाऽकत	
×				
५	६	७	८	
धाऽकत	धाऽऽऽ	धागेतींना	कीटतकताऽतीर	
२				
९	१०	११	१२	
कीटतकतीरकीट	तकताऽतीरकीट	धाऽऽऽतीरकीट	तकताऽतीरकीट	
०				
१३	१४	१५	१६	
धाऽऽऽतीरकीट	तकताऽतीरकीट	धाऽकत	धाऽकत	धा
३				×

३.२) झपताल

१	२	३	४	५	६	७	८	९	१०	
धी	ना	धी	धी	ना	ती	ना	धी	धी	ना	धी
×		२			०		३			×

कायदा

१	२	३	४	५
धागेतीट	तीटधिना	गिनतीट	धागेतीट	तिनाकीन
×		२		
६	७	८	९	१०
ताकेतीट	तीटतिना	कीनतीट	धागेतीट	धिनागिन
०		३		

पलटा – १

धागेतीट	तीटधिना	गिनधागे	तीटतीट	धिनागिन
×		२		
धागेतीट	तीटधिना	गिनतीट	धागेतीट	तिनाकीन
०		३		
ताकेतीट	तीटतिना	कीनताके	तीटतीट	तिनाकीन
×		२		
धागेतीट	तीटधिना	गिनतीट	धागेतीट	धिनागिन
०		३		

पलटा – २

तीटतीट	धागेधिना	गिनतीट	तीटधागे	धिनागिन
×		२		
धागेतीट	तीटधिना	गिनतीट	धागेतीट	तिनाकीन
०		३		
तीटतीट	ताकेतिना	कीनतीट	तीटताके	तिनाकीन
×		२		
धागेतीट	तीटधिना	गिनतीट	धागेतीट	धिनागिन
०		३		

पलटा – ३

तीटधागे	तीटधिना	गिनतीट	धागेतीट	धिनागिन
×		२		
धागेतीट	तीटधिना	गिनतीट	धागेतीट	तिनाकीन
०		३		
तीटताके	तीटतिना	कीनतीट	ताकेतीट	तिनाकीन
×		२		
धागेतीट	तीटधिना	गिनतीट	धागेतीट	धिनागिन
०		३		

पलटा – ४

धागेधिना	गिनतीट	तीटधागे	धिनगिन	तीटतीट
×		२		
धागेतीट	तीटधिना	गिनतीट	धागेतीट	तिनाकीन
०		३		
ताकेतिना	कीनतीट	तीटताके	तीनाकीन	तीटतीट
×		२		
धागेतीट	तीटधिना	गिनतीट	धागेतीट	धिनागिन
०		३		

तिहाई

तीटधागे	धिनागिन	धाऽऽऽ	ऽऽऽऽ	तीटधागे	
×		२			
धिनागिन	धाऽऽऽ	ऽऽऽऽ	तीटधागे	धिनागिन	धी
०		३			×

झपताल मोहरा – १

१	२	३	४	५	
ताऽ	तूना	कीटतक	ताऽतीर	कीटतक	
×		२			
६	७	८	९	१०	
धाती	धाऽ	धाती	धाऽ	धाती	धी
०		३			×

झपताल मोहरा – २

१	२	३	४	५	
कत्तीर	कीटतक	तीटकत	गदीगन	धाऽऽऽ	
×		२			
६	७	८	९	१०	
तीटकत	गदीगन	धाऽऽऽ	तीटकत	गदीगन	धी
०		३			×

झपताल टुकडा – १

१	२	३	४	५	
घेऽतीरकीटतक	ताऽतीरकीटतक	ताऽऽक्ड	धान्धान्	धाऽऽऽ	
×		२			
६	७	८	९	१०	
ताऽऽक्ड	धान्धान्	धाऽऽऽ	ताऽऽक्ड	धान्धान्	धी
०		३			×

झपताल टुकडा – २

१	२	३	४	५	
धींऽनाऽकीटतक	ताऽतीरकीटतक	धींऽनाऽकीटतक	ताऽतीरकीटतक	धाऽऽऽ	
×		२			
६	७	८	९	१०	
धींऽनाऽकीटतक	ताऽतीरकीटतक	धाऽऽऽ	धींऽनाऽकीटतक	ताऽतीरकीटतक	धी
०		३			×

झपताल – चक्रदार

धागेतीट	तागेतीट	क्डधातीट	कडधातीट	क्डधातीट
×		२		
धागेतीट	घेऽतीरकीटतक	ताऽतीरकीटतक	तक्डाऽन्	तक्डाऽन्
०		३		
धाऽऽऽ	तक्डाऽन्	तक्डाऽन्	धाऽऽऽ	तक्डाऽन्
×		२		
तक्डाऽन्	धाऽऽऽ	धागेतीट	तागेतीट	क्डधातीट
०		३		

क्डधातीट	क्डधातीट	धागेतीट	घेऽतीरकीटतक	ताऽतीरकीटतक
×		२		
तक्डाऽन्	तक्डाऽन्	धाऽऽऽ	तक्डाऽन्	तक्डाऽन्
०		३		
धाऽऽऽ	तक्डाऽन्	तक्डाऽन्	धाऽऽऽ	धागेतीट
×		२		
तागेतीट	क्डधातीट	क्डधातीट	क्डधातीट	धागेतीट
०		३		

१	२	३	४	५	
घेऽतीरकीटतक	ताऽतीरकीटतक	तक्डाऽन्	तक्डाऽन्	धाऽऽऽ	
×		२			
६	७	८	९	१०	
तक्डाऽन्	तक्डाऽन्	धाऽऽऽ	तक्डाऽन्	तक्डाऽन्	धी
०		३			×

माझा अभ्यास

प्र. १ लहरा साथीबरोबर कोणत्याही एका तालात १० मिनिटे स्वतंत्र वादन करा.

प्र. २ त्रितालात एक मोहरा, टुकडा, चक्रदार वाजवून दाखवणे.

प्र. ३ झपतालात एक मोहरा, टुकडा, चक्रदार वाजवून दाखवणे.

४. विविध तालवाद्य वादन

४.१) पखवाज वादन

भजनी ठेका

मात्रा – ८

विभाग – २ (४-४ मात्रांचे)

टाळी – १ (पहिल्या मात्रेवर)

काल – पाचव्या मात्रेवर

१	२	३	४	५	६	७	८
धींऽ	नाधीं	ऽधीं	नाऽ	धींऽ	नातीं	ऽतीं	नाऽ
×				०			

वरील तालामध्ये लग्गी वाजवणे.

१	२	३	४	५	६	७	८	
धातीं	धाडा	तातीं	धाडा	धातीं	धाडा	तातीं	धाडा	धीं
×				०				×

४.२) ढोलकी वादन

दादरा तालाचे किस्म वाजवणे

१	२	३	४	५	६	
धा	धी	ना	धा	ती	ना	
×			०			
धा	तीं	तीं	तक	धीं	धीं	धा
×			०			×
धा	धा	ती	ता	धा	ती	धा
×			०			×

माझा अभ्यास

प्र. १ पखवाजावर भजनी ठेका वाजवून त्यामध्ये लग्गी वाजवा.

प्र. २ ढोलकीवर दादरा तालाचे किस्म वाजवा.

उपक्रम : ज्या गीतामध्ये भजनी ठेक्याचा वापर केला आहे, अशा गीतांची नोंद ठेवा.

५. साथसंगत

भारतीय संगीतामध्ये गायन, वादन, नृत्य यांच्या सादरीकरणामध्ये साथसंगत या कलेला खूप महत्त्व आहे. साथसंगत या शब्दामध्ये त्याचा अर्थ स्पष्ट होतो, साथ करणे, संगत करणे म्हणजेच व्यावहारिक अर्थाने बघितल्यास बरोबरीने चालणे होय. मुख्य कलाकार गायक, वादक, नर्तक यांच्या बरोबर चालणे हीच अपेक्षा साथीदारांकडून असते. आपल्या अस्तित्वाचा मुख्य कलाकाराला केवळ फायदाच झाला पाहिजे अशी मनोवृत्ती असणारा वादकच चांगली साथ करू शकतो. तबलावादकाचे ज्ञान, तयारी, रियाज, अनुभव अशा गोष्टी साथसंगतीमध्ये महत्त्वाच्या आहेत. संगीत मैफिलीमध्ये तालाचे अस्तित्व हे तबलावादकाशिवाय (साथीदाराशिवाय) सिद्धच होत नाही.


भारतीय संगीताचे एक वैशिष्ट्य आहे की यामध्ये समावेश होणारी तालवाद्ये ही स्वतंत्रवादनाबरोबरच साथ संगतीसाठी अत्यंत उपयुक्त आहेत. त्याचे कारण म्हणजे त्या तालवाद्यांची रचना आणि वादनशैली होय. प्रत्येक तालवाद्याची संगत ही गायन शैलीवर आधारलेली आहे. साधारणपणे तबला वाद्याची साथसंगत ही व्यापक आहे कारण शास्त्रीय संगीतापासून ते थेट लोकसंगीतापर्यंत तबला साथीसाठी वाजवला जातो. आपल्या अभ्यासक्रमात साधारणपणे छोट्या ख्यालाबरोबर ठेका वादन कसे करायचे याचे प्रात्यक्षिक घेतले जाते. सर्वसाधारणपणे ठेका स्पष्ट, शुद्ध वाजवणे, छोट्या ख्यालाच्या बंदिशीची लय व ठेक्याची लय एकसारखी राहणे हे चांगल्या साथीदाराचे वैशिष्ट्य आहे. छोट्या ख्यालाबरोबर छोटे मोठे टुकडे, मुखडे योग्य जागी वाजवून समेला येणे हे महत्त्वाचे आहे. छोटे ख्याल साधारण त्रिताल, एकताल, आडाचौताल इत्यादी तालांत गायले जातात.

पखवाजाच्या साथसंगतीमध्ये जोरदार वादन अपेक्षित आहे. भजनाच्या साथीमध्ये पखवाजाचा ठेका भरीव वाटतो. कीर्तनाच्या बरोबर पखजाची साथ उठावदार वाटते. ढोलक, ढोलकीची साथ करताना छोट्या मात्रांच्या तालाचे किस्मे व लग्गी वादन पूरक ठरते. ड्रमसेट व रिदम मशीनवर १ २ ३ आणि १ २ ३ ४ बीटसमध्ये तालाचे विविध प्रकार साथीला वाजवतात.

साथसंगतमध्ये येणारा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे लयबद्ध वादन होय. तालवादक हा लयदार असावा लागतो. गायक, वादक, नर्तक हे तिघेही लयदार असतील तर साथीचा आनंद हा वेगळाच असतो. महत्त्वाचे म्हणजे साथसंगत ही शिकवून येत नाही तर ती अनुभव घेत घेत शिकावी लागते.

उपक्रम : **१) भारतीय संगीतातील तबलावादकांची नावे शोधा.**

२) चार तालवादक साथीदारांची नावे लिहा.



महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

मराठी भारतीय संगीताचा इतिहास व विकास इयत्ता बारावी

₹ ८५.००



मराठी भारतीय संगीताचा इतिहास व विकास इयत्ता बारावी